श्रीमन्मुकुंदराजकृत परमामृत

| | प्रकरण | विषय | ओवी संख्या |
|---|---|---|---|
| 01 | मंगलाचरण | 22 | |
| 02 | अन्यमत-खंडण | 19 | |
| 03 | महावाक्यविवरण | 21 | |
| 04 | स्थूलदेह निरसन | 29 | |
| 05 | लिंगदेह निरसन | 33 | |
| 06 | कारणदेह निरसन | 18 | |
| 07 | महाकारणदेह निरसन | 17 | |
| 08 | शून्य खंडण | 17 | |
| 09 | निधीध्यासन | 21 | |
| 10 | दृश्यभास खंडण | 30 | |
| | 11 | अज्ञान खंडण | 29 |
| 12 | स्वानुभवसुख वर्णन | 13 | |
| 13 | मुक्तिरहस्य | 29 | |
| 14 | साक्षात्कार | 25 | |
| | | | ------ |
| | | | 323 |
| | | | ----- |

आरती सद्‌गुरुनाथा । स्वामी निरंजन समर्था ।
आरती सद्‌गुरुनाथा । स्वामी निरंजन समर्था ।।धृ।।
सदाचार सार साचा । मंत्र दिधला जीवनाचा ।
सर्व धर्माचा समन्वय । मार्ग दाविला अद्वय ।।1।।
विवेक वैराग्याचा दीप । लावुनी चरणासमीप ।
उज्जयनी शाखा, विहंगम । शांभवी दीक्षा सुगम ।।2।।
दूर केले हो आवरण । त्रिवेणी संगमी स्नान ।
स्वयंप्रकाशे भगवान । निखळ आनंदी रममाण ।।3।।
सद्‌गुरुकृपा होता । अवघी हरपली चिंता ।
विनयानंद विनवी आता । चरणी ठेवूनिया माथा ।।4।। दि.21-12-1997

---

शुध्द, स्थिर, व्यापक आणि परिपूर्ण म्हणजे परमार्थ.
समन्वय से समाधि

# परमामृत

**श्रीमन्मुकुंदराजकृत**

**परमामृत**

**प्रकरण पहिले - मंगलाचरण**

**। श्रीगणेशाय नमः। श्रीसरस्वत्यै नमः। श्रीगुरुभ्यो नमः ।**

**नमो श्रीसद्‌गुरुनाथा । तूं परमप्राप्तिचा दाता । कृपासिंधुजी समर्था । अनंता अपारा ।1-1।**

हे सद्‌गुरुश्रेष्ठा, तुला नमस्कार असो । कारण तूं सर्वांहून जें उत्तम त्याची (आत्मज्ञानाची) प्राप्ति करून देणारा आहेस. तसेंच तूं समर्थ असून, दयेचा अगाध व अमर्याद असा समुद्र आहेस.

**तूं आनंदमय स्वयंप्रकाश । कैवल्यदाता परम ईश । तूं निजरूपें अविनाश । निराकार ।1-2।**

हे गुरो, तूं केवळ आनंदाचाच बनलेला आहेस. तूं स्वयंप्रकाश आहेस. तूं मोक्ष देणारा आहेस. तूं सर्व ताब्यात ठेवणारा आहेस. तूं आत्मस्वरूपच आहेस. तुझा नाश होत नाहीं, कारण तूं आकाररहित आहेस !

**तूं निःसंग निरंजन । तूं निरंतर अभिन्न । नाही तुजसमान । कोणी देवा ।1-3।**

तुला कोणाची संगति नाहीं,तूं प्रारब्धरहित आहेस. तूं अगदी घनदाट भरलेला आहेस.तुझ्या ठिकाणी भेद नाहीत.हे स्वयंप्रकाशा (देवा),तुझ्यासारखा कोणी नाही.

**तूं जंव कृपा करिसी । तंव संसारबंधना तोडिसी । अविद्येपासूनि सोडविसी । तारिसी जीवा ।1-4।**

हे गुरो, तूं ज्या क्षणी कृपा करतोस त्याच क्षणी संसाराची (जन्ममृत्यूची) बंधने तोडून टाकतोस (ज्या ठिकाणीं सत्व, रज व तम या गुणांचें साम्य असतें तिला प्रकृति म्हणतात. शुध्द सत्वगुण अधिक असतो,तेव्हां तिला माया व सत्वगुण अशुध्द असतो तेव्हां तिला अविद्या असें म्हणतात.) अविद्येपासून तूं जीवाला सोडून त्याला मुक्त करतोस.

**न होय जें देवां, असुरा । तें तुझें करणें दातारा । समर्थ न देखें दुसरा । तुजवांचुनी ।1-5।**

हे उदारा सद्‌गुरो ! जें देव किंवा राक्षस यांजकडून होत नाही, तें तूं करतोस. तुझ्यावांचून दुसरा कोणी समर्थ (अशक्य दिसणा-या गोष्टि लीलेनें करणारा ) आम्हांस कोठें दिसत नाहीं.

**आणिका कवणा नमस्कारूं । कवणाचें स्तवन करूं । जय जया जी श्रीगुरु । अगाध महिमा ।1-6।**

हे गुरो, तुझ्यावांचून दुस-या कोणाला नमस्कार करूं? कोणाची स्तुति करूं? हे गुरो ! तुझा जयजयकार असो; कारण तुझा महिमा अगाध आहे.

**जैसा सर्व पटामाजी एक तंतु । तैसा तूं विश्वभरितु । सर्वव्यापुनिविरहितु । अलिप्त तूं ।1-7।**

ज्याप्रमाणें एक सूतच सर्व वस्त्र व्यापून राहिलेलें असतें, त्याप्रमाणें तूं या सर्व सृष्टिला एकटाच व्यापून राहिला आहेस. (म्हणूनच तुला सूत्रात्मा असें म्हणतात.) तथापी, हें सर्व विश्व व्यापून देखील तूं अलिप्त आहेस.

**हीं अनेक सगुण रूपें । तूं धरिशी आपुलेनि व्यापें । शिवशक्तिचीं साकार रूपें । दाविशी तूं ।1-8।**

तूं व्यापक असल्यामुळें जगामध्यें दिसणारी अनेक प्रकारचीं सगुणरूपें धारण करितोस. ब्रह्म आणि माया, यांची जी अनेक प्रकारचीं आकारांची रूपें आहेत, ती तूंच दाखवितोस.

**तुजविन अन्य न देखें कोणी । म्हणोनि आणिकातें न मनीं । हे मस्तक तुझिये चरणीं । ठेविले सत्य ।1-9।**

हे सद्‌गुरो ! तुझ्याशिवाय मी दुस-या कोणास पहात नाहीं. म्हणून इतर कोणतीहि गोष्ट माझ्या मनामध्यें येत नाहीं. हे गुरो ! माझें मस्तक मी खरोखरच तुझ्या पायांवर ठेविलें आहे.

**तूं शुध्दात्मा स्वयंज्योति । तुझी सर्वत्र ज्ञान दीप्ति । नमोनमोजी श्रीगुरुमुर्ति । आनंद विभो ।1-10।**

तूं स्वयंप्रकाश शुध्द, असा आत्मा आहेस. तुझ्या ज्ञानस्वरूपाचा प्रकाश सर्वत्र भरलेला आहे. हे आनंदस्वरूपा, विश्वव्यापका सद्‌गुरो, तुला माझे वारंवार नमन असो !

**तू ब्रह्मारूपें उत्पत्ति करिसी । विष्णुरूपें प्रतिपाळिसी । रूद्ररूपें संहारिसी । पुनरपि रचावया ।1-11।**

हे गुरो ! तूं रजोगुणाचा आश्रय करून ब्रह्मा होऊन सर्व जग उत्पन्न करितोस. सत्वगुणाचा आश्रय करून विष्णु होऊन सर्व जगाचे रक्षण करितोस. आणि तमोगुणाचा आश्रय करून रूद्र होऊन सर्व जगाचा नाश करतोस. ह्याप्रमाणे तुझा क्रम सर्वदा चालूच असतो.

**तू सर्वसाक्षि सर्वज्ञ । तू सर्वविद्याविज्ञ । तू तत्वार्थ जीव सर्वज्ञ । सर्वेश्वर ।1-12।**

हे गुरो ! तूं सर्व साक्षि (सर्व विश्व पहाणारा ) आहेस. कारण तूं सर्वज्ञ ( सर्व जाणणारा ) आहेस. तूं सर्व

विद्या जाणणारा आहेस. तत् आणि त्वं पदांनीं ज्यांचा बोध होतो, तो सर्वज्ञ आणि जीवहि तूंच आहेस. तूं सर्वांना आपल्या ताब्यांत ठेवणारा आहेस.

**तू जाणशी स्वरूपाशीं । म्हणोनि जाणिव स्फुरविशी । परमात्मा म्हणविसी । यया उपाधिस्तव ।1-13।**

हे गुरो ! तूं आत्मस्वरूपाला जाणतोस, म्हणून तुझ्या ठायीं असलेलीं जाणिव (ज्ञान) प्रकट होते. ह्या जाणिवेच्या उपाधिच्याही पलिकडचा तूं असल्यामुळें तूं आपणांस परमात्मा असें म्हणवून घेतोस.

**तुझिये इच्छेचा विस्तारू । विस्तारलें हें चराचरू । जीव अंश अपारू । स्फूरसी तूंचि।1-14।**

हें स्थावरजंगमात्मक जग एवढें पसरलें आहे, हा सर्व तुझ्या इच्छेचाच पसारा आहे. जगामध्ये असलेल्या अपार जीवरूपाने तूंच प्रकट झाला आहेस.

**सर्व जीवांची ज्ञप्तिकळा । जगासि जाणे सकळा । तो ज्ञानात्मा जिव्हाळा । त्वंपदाचा तूं ।1-15।**

सर्व जीव आपल्या ज्या ज्ञानशक्तिच्या योगानें सर्व जगाला जाणतात, ती ज्ञानशक्ति तूंच आहेस, (तत्वमसि हे छांदोग्य उपनिषदांतील महावाक्य असून जगाचे उपादान कारण व निमित्त कारण असें जें ब्रह्म, त्याला 'तत्' असें म्हटलें आहे, व अशुध्द सत्वप्रधान मायेमध्यें प्रतिबिंबित झालेलें जें ब्रह्म म्हणजे जीव, त्याला 'त्वं ' असें म्हटलें आहे, व ' असि 'या पदाने त्यांचें ऐक्य दाखविलें आहे, 'तें तूं आहेस ' असा त्या महावाक्याचा शब्दार्थ आहे.) तत्वमसि या महावाक्यांतील 'त्वं ' पदाचा जो गर्भितार्थ तो तूंच आहेस.

**माया अविद्या संबंधें । जीव ईश्वर होशी भेदें । हाहि आपुलेनि विनोदें । खेळ तुझा ।1-16।**

हे गुरो, तूं मायेच्या संबंधानें ईश्वर आणि अविद्येच्या संबंधाने जीव असे भेद धारण करतोस, परंतु हाहि तुझा एक गमतीचा खेळच आहे !

**तूं स्वानंद सदोदित । असिपदीं तदात्मा अलिप्त । पदातित स्वयंभरित । कैवल्य तू ।1-17।**

हे गुरो, तूं तत् व त्वं या दोन पदांतील अर्थाचें असि या पदामध्यें ऐक्य करून (केवळ तत् पदानें दर्शविलेलें ब्रह्मच होऊन ) तूं सर्वदा स्वानंदाचा अनुभव घेत असतोस. तूं तत् पदानें दर्शविलें जाणारें ब्रह्मच आहेस. वास्तविक पाहतां तूं अलिप्त आहेस, तूं तत् व त्वं , या पदांच्या अर्थाच्या पलिकडलाच आहेस, तूं प्रत्यक्ष मोक्षच आहेस.

**ऐशी करितां तुझी स्तुति । मुकावल्या वेदश्रृति । मग मी प्राकृत किती । वर्णावया योग्य तुज ।1-18।**

हे सद्‌गुरो, अशा प्रकारें तुझी स्तुति करणारे वेद मुके झाले मग मी तर पामर आहें, मी तुझें वर्णन करावयास कशानें योग्य होणार !

**तूं प्रेमभरित परम पुरूष । चतुर्विध वाचेचा ईश । आतां देई देवा मतिप्रकाश । तुज जाणावया ।1-19।**

हे गुरो, तूं प्रेमळ व श्रेष्ठ पुरुष आहेस. परा, पश्यंती, मध्यमा आणि वैखरी, या चारी वाणी तुझ्या ताब्यांत आहेत. यासाठी, हे देवा गुरो, तुझें स्वरूप जाणतां येण्याइतकें माझ्या बुध्दिला सामर्थ्य दे !

**तूं कृपासिंधु जरि वरद होसी । तरि अज्ञान जीवाचें फेडिसी। मग लोपलें प्रगटविसी । शिवत्व सिध्द।1-20।**

हे गुरो, तूं दयेचा समुद्र आहेस. तूं जर वर देशील तरच जीवाच्या अज्ञानाचा नाश करशील. आणि अज्ञानामुळें जीवाला जें आपले शिवपण, दिसत नाहीसें झालें आहे, तें तूं स्पष्ट दाखवून देशील.

**म्हणोनि मी विनवी शरणागतः । तूं ज्ञानसूर्य ह्रदयीं उदित। तरि अविद्यातम क्षणांत । फिटेल स्वामीं ।1-21।**

यासाठी मी आपणास शरण येऊन विनंति करीत आहें. हे गुरो, तूं ज्ञानरूपी सूर्य जर माझ्या अंतःकरणांत उदय पावलास, तर अविद्यारूपी अंधकार क्षणामध्यें नाहीसा होईल.

**यावरि श्रीगुरु झाले प्रसन्न । करविती परमार्थीचें कथन। बोलेन सकळ शास्त्रांचें मंथन। निर्वाण तेंचि।1-22।**

ही शिष्याची स्तुति ऐकून श्रीगुरु प्रसन्न झाले, आणि त्यांनी माझ्या मुखानें परमार्थ सांगविला, म्हणून सर्व शास्त्रांचा नीट विचार करून त्यांचें जें सार असेल तेंच सांगेन. मोक्षहि तोच होय.

**इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते मंगलाचरणं नाम प्रथमं प्रकरणं संपुर्णम् ।**

---

## प्रकरण दुसरें - अन्यमत-खंडण

**जें जाणोनि सर्व कीजे । जें सर्वदा अभ्यासिजे । जेथें परतौनि चित्तें राहिजे । बुडी देउनी ।2-1।**

**अभ्यंतरिचें ज्ञान । प्रकट बोलेन साधन । जेथें रतले योगीजन । निरंतर ।2-2।**

प्रथमतः ज्याचें ज्ञान करून घेवून मग इतर गोष्टि करावयाच्या, ज्याचा सर्वदा अभ्यास करावयाचा,

## परमामृत

ज्याठिकाणीं मनानें अगदीं एकाग्रपणानें राहिलें पाहिजे. असें जें गुप्त ज्ञान तें प्राप्त होण्याचें साधन आतां सांगतों. त्याच ज्ञानाच्या ठिकाणीं योगी सर्वकाल रममाण होतात.

**जैसे सागरीचें अमृत । कां मंथूनि काढिजे नवनीत । तैसे सार सर्वांत । तेंचि सांगेन ।2-3।**

जसें समुद्रांतील अमृत, किंवा दूध घुसळून काढलेलें लोणी, त्याप्रमाणेंच सर्व शास्त्रामध्यें जें अगदी सार असेल, तेंच पुढें मी सांगेन.

**नलगे यापरतें कांहीं करणें । नानापरींचीं अभ्यासनें । संकल्पविकल्पात्मक साधनें । सर्व त्यजिजे ।2-4।**

मी जें सांगेन, त्याशिवाय दुसरीं अनेक प्रकारचीं साधनें वारंवार करण्याची कांहीं जरूरी नाहीं. संकल्पविकल्पात्मक म्हणजे मनाला ज्यांचें ग्रहण करतां येतें. ती सर्व साधनें सोडून द्यावी.

**संकल्पविकल्पत्मक मतें । नाना दर्शनें कष्ट ते । जंव महावाक्याचें विवरण चित्तें । अनुभविले नाहीं ।2-5।**

ज्यामध्यें अनेक प्रकारचें वादविवाद असतात अशा प्रकारच्या अनेक शास्त्रांचा अभ्यास करणें हे विनाकारण श्रम आहेत; कोठपर्यंत? जोपर्यंत एकाग्रमनानें महावाक्याच्या अर्थाचें विवरण केलें नाहीं, तोपर्यंत.

**जो निरूपाधिस्वरूप । अनुभविलें नाहीं आपेंआप । तोंवरि कष्टासि माप । कवण करि ।2-6।**

जोंपर्यंत परमात्म्याचें निरुपाधिक स्वरुप आपल्या अनुभवास स्पष्टपणें आलें नाहीं; तोपर्यंत जे कष्ट होतात, त्यांची गणना कोण बरें करील?

**व्रतें तपें नियमाचिया सांकडीं। संदेहिं गुंतलीं बापुडीं । तीं केंविं पावतील पैलथडी । संसारसागराचिये ।2-7।**

जे कोणी व्रतें, तपश्चर्या, अनेक प्रकारचे नेमधर्म इत्यादि साधनांच्या संकटांत सांपडले, ते बिचारे संशयांत गुरफटून गेले ! ते या

संसाररूपी समुद्राच्या पलिकडच्या तीरास कसे बरें जातीस?

**पूजा स्नानें तीर्थे दानें । मंत्र यंत्र याग हवने । कीजे तितुकें फळ भोगणे । स्वर्गादिक सर्वथा ।2-8।**

पूजा, स्नानें, तीर्थें, दानें, मंत्र, यंत्रें, यज्ञयाग, हीं जितकीं करावीं तितक्या पुरतेंच स्वर्गभोग वगैरे फळ मिळतें.

**जप तप अनुष्ठानें । आणि नानापरिचीं साधनें । मोक्ष न पाविजे आत्मज्ञानें -। वांचोनियां, सर्वथा ।2-9।**

जप, तप, अनुष्ठानें, आणखी अनेक प्रकारचीं साधनें, यांच्यापासून, आत्मज्ञान झाल्याखेरीज मोक्ष मिळत नाहीं.

**जोवरि जीवेश्वरउपाधि । निरसूनि नेणिजे ऐक्यसिध्दि ।**
**भेद सांडुनि शबलविरोधी । शुध्द स्वरूप न प्रकाशे।2-10।**

जोंपर्यंत जीव आणि ईश्वर (अशा ज्या मायेच्या व अविध्येच्या योगानें भासमान होणा-या) उपाधि त्यांचें निरसन करून ऐक्य केलें नाहीं, त्यांमधील अशुध्दपणाचा विचित्र भेद काढून टाकला नाहीं, तोंपर्यंत आत्मस्वरूपाचें ज्ञान होत नाहीं.

**त्वं पद तत्पदीचें लक्ष्य । शबल सांडोनि परोक्ष । नेणिजे शुध्द अपरोक्ष । तववरि मोक्ष कैंचा ।2-11।**

जोंपर्यंत, त्वं या पदानें ध्यानांत येणारा अर्थ व तत् या पदानें ध्यानांत येणारा अर्थ, या दोहोंपैकीं मायोपाधिक (शबल) असा जो त्वं पदाचा अर्थ, तो सोडून देऊन, शुध्द व साक्षात् भासमान होणा-या तत् पदार्थाचें ज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत मोक्ष कोठून प्राप्त होईल?

**जोंवरि तो येक मी येक । हा न तुटेचि कलंक । जंव न प्रकाशे सम्यक । तंव परमप्राप्ति न घडे ।2-12।**

जोंपर्यंत तो वेगळा, व मी वेगळा, अशा प्रकारचा संशय नाहीसा होऊन उत्तम प्रकारचें ज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत श्रेष्ठ अशा ब्रह्माची किंवा मोक्षाची प्राप्ति होत नाहीं.

**जंववरि त्रिपद शोध न घडे। अर्धमात्रापर तें न सांपड। क्षराक्षर निवडा न घडे। उत्तमपुरूषी समरस।2-13।**

जोंपर्यंत तत् त्वं आणि असि या तीन पदांच्या अर्थाबद्दल ज्ञान झालें नाहीं, अर्धमात्रेच्या पलिकडे असणारें (ओम्

म्हणजे प्रणवापलिकडे असणारें ) तें सांपडलें नाहीं, क्षर व अक्षर विचार करून त्यांतील निवड करतां आली नाहीं, क्षर व अक्षर यांच्या पलिकडील जो उत्तम पुरूष सर्वत्र घनदाट भरलेला आहे, त्याजविषयी समजूत पटलेली नाहीं.

**सच्चिदानंदविवरण । जंव नेणिजे कार्यकारण । निवळेना शुध्द आत्मज्ञान । तंव मोक्ष कैचा ।2-14।**

सत् चित् व आनंद या पदांचा जोंपर्यंत विचार घडला नाहीं, तसेंच कोणत्या कारणापासून कोणतें कार्य घडतें, हें समजून येऊन, शुध्द असें आत्मज्ञान झालें नाहीं, तोंपर्यंत मोक्ष कोठून लाभणार ?

**सद्‌गुरुमुखें वेदांत श्रवण । न घडे तयाचें मनन । जव न पविजे निदिध्यासन । तंववरि मोक्ष कैंचा ।2-15।**

जोंपर्यंत सद्‌गुरुच्या मुखांतून वेदांताचें श्रवण (तत्वमसि, प्रज्ञानं ब्रह्म इत्यादि महावाक्यांचा अर्थ गुरुमुखानें ऐकणें याला श्रवण असें म्हणतात. श्रवण केलेल्या अर्थाचा साधकबाधक प्रमाणांनीं विचार करून त्या अर्थाचें ग्रहण करणें याला मनन असें म्हणतात. श्रवण आणि मनन यांच्या योगानें जो अर्थ मनांत बिंबला, त्याच अर्थाचें ठिकाणीं मन एकाग्र करणें याला निदिध्यासन असें म्हणतात.) घडलें नाहीं, कदाचित् श्रवण घडलें असल्यासहि त्याचें जोंपर्यंत निदिध्यासन - सतत - विचार घडला नाहीं. तोंपर्यंत मोक्ष कोठून मिळणार ?

**सांडुनि वेदांतसिध्दांत। जे कां बोलतो पाखांड मत। त्यांची नायकावी मात। महावाक्यार्थ अनुभविजे ।2-16।**

जे कोणी वेदान्त शास्त्रानें सिध्द केलेले सिध्दान्त सोडून देऊन, नास्तिकांच्या मताचा स्वीकार करतात, त्यांचे भाषण ऐकूंसुध्दां नये. अशा वेळीं अहं ब्रह्मास्मि, तत्वमसि, प्रज्ञानं ब्रह्म इत्यादि महावाक्यांचा विचार करावा.

**वेद बोलिला सृष्टिक्रम । तो सांडुनि सकळ धर्म । वेदांताचें निजवर्म । लाहिजे गुरुमुखें ।2-17।**

वेदानें सृष्टिचा क्रम यथास्थित चालावा, म्हणून पुष्कळ धर्म (कर्मयोग) सांगितला आहे, तो संसारी पुरुषाकरतां आहे, असें समजून तो सोडून द्यावा, आणि गुरुमुखानें वेदान्ताचे मुख्य वर्म समजून घ्यावें .

**वेदांताचें अबोलणें । सिध्दांतींचें जाणोनि नेणोनि नेणणें । जेथें मिळणी होय तें पावणें । कैवल्यपद ।2-18।**

ज्या ठिकाणीं वेदान्ताच्या बोलण्याची मजल खुंटते, आणि सिद्दान्त सुध्दां जाणते असूनहि अज्ञान्याप्रमाणें होतात. (अशा रीतिनें जेथें मौनामध्ये वेदान्त व शास्त्रें यांची एकवाक्यता होते.) तेंच मोक्षपद असें जाणून ते प्राप्त करून घ्यावें.

**जीवेश्वराची मिळणी । होय परमपदनिर्वाणीं । तेथें द्वैतबुध्दिची कडसणी । तुटोनि जाय ।2-19।**

ज्या वेळीं खरोखर मोक्ष प्राप्त होईल, त्याच वेळीं जीव आणि ईश्वर यांचें ऐक्य होतें आणि द्वैतबुध्दि (दुजेपणा - दुजाभाव) हें जें संकट तें आपोआप नाहींसें होतें.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते अन्यमतखंडण नाम द्वितियं प्रकरणं संपुर्णम् ।**

---

**प्रकरण तिसरे - महावाक्यविवरण.**

**करूनि आदिशक्तिचा अंगिकारू। जो करि उत्पत्तिस्थितिसंहारू । सर्वसाक्षि सर्वेश्वरू । शबल बोलिजे ।3-1।**

तो सर्वसाक्षि, व सर्वांचें नियमन करणारा, असा परमात्मा जेव्हां आदिशक्ति अशा मायेचा स्वीकार करून उत्पत्ति, स्थिति आणि संहार करितो, तेव्हां त्याला शबल असें म्हणतात.

**स्थुलदृष्टिचें जाणणें । तितुकेंहि निरसणें । उरे अदृश्य जो द्रष्टेपणें । तोचि शुध्द परमात्मा ।3-2।**

जेवढें म्हणून आकार युक्त असल्यामुळें नेत्रानें जाणतां येतें, तेवढें सर्व सोडून द्यावें, आणि नंतर स्वतः अदृश असून सर्व जग साक्षिरूपानें पहाणारा असा जो कोणी बाकी राहतो, तो परमात्मा, असें ओळखावें.

**सर्वज्ञ आणि सर्वेश्वरू । ऐंसा सकळशास्त्रांचा निर्धारू । तोचि जाणिजे परात्परू । ज्ञप्तिमात्र ।3-3।**

तो परमात्मा सर्वज्ञ (सर्व जाणणारा ) आहे, आणि सर्वेश्वर (सर्व आपल्या ताब्यांत ठेवणारा) आहे, असा सर्व शास्त्रांचा निश्चय आहे. असा जो ज्ञानस्वरूप परमात्मा, तो सर्वांपलिकडचा आहे, असें समजावें.

**अनंतशक्तींचा द्रष्टा । ठाणमाणविरहित प्रतिष्ठा । जया अपरमित बनदाटा । पार नेणिजे ।3-4।**

तो परमात्मा अनंत शक्तींप्रत पाहणारा आहे. त्याला राहण्याला कोणतेंहि स्थान नाहीं, किंवा त्याला मोजण्यासारखें मापही नाही. म्हणून तो अपरमित ( मोजतां न येण्यासारखा ) व सर्वत्र भरलेला आहे. त्याचा पार लागत नाहीं.

**तया बोलिजे शुध्द । निरसिजे शबलत्व अशुध्द । ज्ञानघनानंदासिध्द । परमेश्वर ।3-5।**

उपाधींचा निरास करावा, म्हणजे जें कांहीं राहतें, त्याला शुध्द असें म्हणावें. तो केवळ ज्ञानमय, आनंदमय आणि स्वतः सिध्द असा परमेश्वरच आहे.

**ब्रह्मांड हिरण्यगर्भ माया । जो वेगळा या देहत्रया । मूळप्रकृति महामाया । यांविलक्षण जो ।3-6।**

हें सर्व ब्रह्मांड, विराट् स्वरूप, माया व तीन देह ( स्थूलदेह, सूक्ष्मदेह व कारणदेह ) मूळ प्रकृति, महामाया, ह्या सर्वांहून तो वेगळा आहे.

**उत्पत्ति स्थिति संहार । सर्वसाक्षित्वाचा व्यवहार । यां अवस्थातित अपार । आपेआप जो ।3-7।**

उत्पत्ति स्थिति, संहार किंवा साक्षिरूपानें करायाचे उद्योग, या सर्वांच्याहि तो पलिकडचा आहे. तो आपला

आपणच आहे.

**ब्रह्मा विष्णु रूद्र । आणि चौथा हा सर्वेश्वर । यावेगळे अपरंपार । शुध्द ब्रह्म जे ।3-8।**

तो परमात्मा ब्रह्मा, विष्णु, रूद्र किंवा चौथा सर्वेश्वर यांहून वेगळा आहे, त्याचा अंत लागत नाहीं. तो शुध्द ब्रह्म होय.

**याचिपरि पाहतां । जीव अविद्या विरहितां । काम्यकर्मातिता । जाणिजे ऐंसा ।3-9।**

याच रीतिनें विचार करावा, आणि जीव व अविद्या यांजमुळें घडणारीं जीं काम्यकर्में त्याच्या पलिकडचाच आहे. ( जीवाच्या हातून अविद्येनें घडणारीं जीं सहेतुक कर्मे या कर्मापासून त्याची प्राप्ति व्हावयाची नाहीं, असें समजावें) (नित्य नैमित्तिक आणि काम्य अशीं तीन प्रकारचीं कर्में आहेत. पंचमहायज्ञ करणें हें नित्य कर्म होय. ग्रहण किंवा पर्वणी आली असतां त्या संबंधाची जी कर्में करावीं लागतात, तीं नैमित्तिक होते; आणि आपणाला अमुक लाभ व्हावा अशी इच्छा मनांत धरून त्या आशेनें केलेली कर्मे तीं काम्य कर्मे होत. नित्य कर्मे केली नाहींत तर दोष लागतो, म्हणून केलींच पाहिजेत. पण काम्य कर्मे केल्यामुळें जें फळ भोगावयाचें तें भोगीत, तेवढा वेळपर्यंत मोक्षप्राप्तीस उशीर लागतो, म्हणून काम्यकर्माचा निषेध वेदान्तानें सांगितला आहे.)

**स्थुळ सूक्ष्म कारण । चौथा देह महाकारण । जागृति स्वप्न सुषुप्ती जाण । तुरिया चौथी ।3-10।**

स्थुळ, सूक्ष्म, कारण व महाकारण, हे चार देह होत. जागृति, स्वप्न, निद्रा आणि तूर्या, या चार अवस्था होत.

**विश्व तैजस प्राज्ञ । प्रत्यगात्मा सर्वज्ञ । हे अभिमानी संज्ञ । शबल त्वंपदार्थी ।3-11।**

मायेच्या उपाधिनें युक्त असा जो त्वं पदार्थ त्याच्या ठिकाणी (चार देह व चार अवश्था यांबरोबर ) विश्व, तैजस,प्राज्ञ व प्रत्यगात्मा हे चार अभिमानी आहेत.

**या इतुकियांचा द्रष्टा । तो ज्ञानमय तया प्रगटा । शुध्द बोलिजे प्रतिष्ठा । जीवत्वनिरसें ।3-12।**

जीवत्वाचा निरास करून, चार देह, चार अवस्था व चार अभिमानी यांना पाहणारा जो, तोच ज्ञानस्वरूप परमात्मा होय. त्यालाच शुध्द ब्रह्म असें म्हणावें.

**शबल तो वाच्य पक्ष । शुध्द बोलिजे लक्ष्य । लक्ष्यीं ऐक्य जाणितल्या मोक्ष । सिध्दीच लाभे ।3-13।**

मायोपाधिक जो शबल तो त्वं पदाचा वाच्य ( शब्दाचा उच्चाराबरोबर समजणारा अर्थ ) होय. आणि जें शुध्द ब्रह्म ते लक्ष्य ( विचार केला असतां ध्यानांत येणारा अर्थ ) होय. हा लक्ष्यार्थ जर उत्तमपणें समजला, तर तात्काळ मोक्षरूपी सिध्दि प्राप्त होते.

**दोन्हीं नयनीं एक दृष्टि । दोहि श्रवणीं एक नाद उठी । दोहीं अधरपुटीं । एकचि शब्द ।3-14।**

जसे डोळे दोन असले तरि पाहण्याचें कार्य एकच घडतें, किंवा कान दोन असले तरि ऐकण्याचें कार्य एकच घडतें, किंवा ओठ दोन असले तरि शब्द एकच उमटतो.

**तैसें दोहीं पदींचे एक विवरण । करितां जीवेश्वराचें निरसन । शुध्द लाधे तया कवण । द्वैत कल्पी ।3-15।**

त्याप्रमाणें तत् व त्वं या दोन्ही पदांनीं एकच पदार्थाचें स्पष्टीकरण होतें. तत् व त्वं या दोन्ही पदांचें ऐक्य करून जीव व ईश्वर यांचें निरसन केलें, म्हणजे मग शुध्द अशा ब्रह्माची प्राप्ती घडते. अशा शुध्द ब्रह्माचे ठिकाणीं दुजेपणा कोण बरें कल्पील ?

**जैसें महदाकाश अखंड पूर्ण । घटमठीं दिसे भिन्न । घटमठाकाश ऐसें जाण । बोलती तया ।3-16।**

सर्वव्यापी असें मोठें थोरलें आकाश एकच असून घटामध्यें ( घागरीमध्ये ) असलेलें तें घटाकाश व मठामध्यें ( घरामध्यें ) असलेलें तें मठाकाश असा भेद दिसतो, म्हणून त्याला घटाकाश व मठाकाश अशी निरनिराळीं नांवें ठेवितात.

**ते घट मठ दोन्ही भंगतां। ठायींचेंचि ऐक्य तत्वतां। तैसें जीवेश्वर उपाधि निरसतां । स्वस्वरूप एक ।3-17।**

पण तो घट फुटला व मठ मोडला, म्हणजे, तीं दोन्हीं मर्यादित आकाशें विस्तीर्ण महदाकाशांत मिसळून एक होताता. त्याप्रमाणेंच जीव व ईश्वर या दोन उपाधिंचा नाश झाला असतां एकच (अद्वितीय) असें आत्मरूपच अवशिष्ट (शिल्लक) राहतें.

**माया अविद्या नाशीं । ऐक्य होय जीवेश्वरासीं । ऐसें बुझोनियां मानसीं । सुखिया होईजे ।3-18।**

माया व अविद्या, यांच्या आश्रयानें असणारे जे जीव व ईश्वर, त्यांचें मायेच्या व अविद्येच्या नाशानें ऐक्य होतें; अशी एकदा मनाची ठाम समजूत करून घ्यावी, आणि सुखी व्हावें.

**माया अविद्येसि पाहतां। विरोध भासे उभयतां। म्हणोनि शबल त्यागें शुध्द घेतां। अखंड एकरस ब्रह्म ।3-19।**

# परमामृत

ईश्वर आणि जीव हे मायेचा व अविद्येचा आश्रय करून एकमेकांकडे पाहत असतात, म्हणून त्यांना उभयतांमध्यें दुजेपणा आहेसें वाटतें. यासाठीं जे शबल, म्हणजे मायेपाधिक व अविद्योपाधिक त्याचा त्याग करावा. आणि अखंड ओतप्रोत भरलेलें, असें एक परब्रह्म जें अविशिष्ट राहतें, त्याचा स्विकार करावा.

**ऐसेनि महावाक्यविवरणें । त्वंपद तत्पद शोधणें । असिपदी पावणें । ऐक्यसिध्दि ।3-20।**

याप्रमाणें तत्वमसि या महावाक्याचा विचार करावा. त्वं व तत् या पदांचा विचार करून त्यांचें असि या पदामध्यें ऐक्य करावें

**म्हणूनि या दृष्टिविण । सकळ भेदमतें जाण । तें बोलिजे खंडज्ञान । मायिक व्यवहार ।3-21।**

खरें ज्ञान तें असें आहे. अशा प्रकारच्या ज्ञानावांचून जें ज्ञान तो द्वैतवाद होय; तें अर्धवट ज्ञान असल्यामुळें तो मायेचा व्यवहार समजावा.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते महावाक्यविवरण नाम तृतियं प्रकरणं संपुर्णम् ।**

---

**प्रकरण चौथे - स्थूलदेहनिरसन**

**आतां अद्वैत पाहणें । तें दुसरे करूनियां जाणणें । पुनरपि मुरवणें । ठायिंच्या ठायी ।4-1।**

आतां जें अद्वैताचें ज्ञान करून घ्यावयाचें आहे. तें दुस-या एका रीतिनें करून घ्यावयाचें आहें, आणि अशा रीतिनें, तें अगदी मनांत घट्ट बिंबवून घ्यावयाचें आहे.

**उफराटे दृष्टिचें पाहणें । जे दृष्टिमाजी दृष्टि मुरविणें । पहा तया मुळासि जाणणें । स्वस्वरूपासि ।4-2।**

हा विचार उलट सृष्टिचा आहे.( ज्या वेळीं सृष्टींतील आकार युक्त पदार्थ आपण पहातों त्यावेळीं डोळे हे पहाणारे असतात. पण जर आपलाच डोळा आपल्यास पहावयाचा असेल, तर तो मनानेंच पहावा लागणार. मनाला बुध्दिनें पहावयाचें, आणि बुध्दिला पहाणारा तोच साक्षि आत्मा असें आचार्यानीं वाक्‌असुधा या प्रकरण ग्रंथामध्यें सांगितले आहे.) कारण, द्रष्टा (पहाणारा) जो स्थूल देह तें दृश्य म्हणजे पाहण्याचा पदार्थ आहे, असें समजून तो साक्षिच्या दृष्टिमध्यें बिंबित झालेला आहे, असें कल्पावयाचें आणि अशा रीतिनें पहात पहात, स्वस्वरूप असें जें मूळ त्याला पहाणारा कोणी नाही असें अग मुळापर्यंत शोधीत जावयाचें आहे.

**तेथूनि परतें पहातां । नाहीपहाणें सर्वथा । दुमदुमीत अखंडिता । माजी पडिजे ।4-3।**

तेथून पलिकडे पाहूं लागलें असतां पुढें पहावयाचा दुसरा पदार्थ दृष्टिसच पडत नाहीं. जिकडे तिकडे अखंडित असा एकच पदार्थ भरलेला दृष्टिस पडतो.

**जेथें नाहीं माया अविद्या । जे अपरिमित स्वसंवेद्या । ते सांगे ब्रह्मविद्या । सावधान परियेसा ।4-4।**

ज्या ठिकाणीं माया व अविद्या यांचा संबंध नाही, जें मोजलें जात नाही, जें स्वतःच मात्र जाणतां येतें, तें ब्रह्मज्ञान आतां सांगतों; तें सावधानपणानें ऐका.

**जे घनानंदसुखाची राशि । प्रवेशोनि तये स्वप्रकाशीं । असिजे गमनागमनासी । नासोनि सदा ।4-5।**

तें ब्रह्मज्ञान अत्यंत आनंदमय आणि सुखाच्या ढिगाप्रमाणें आहे. त्या स्वयंप्रकाशी ब्रह्मज्ञानाची प्राप्ति करून घेवून जन्ममृत्यूचे फेरे चुकवून आनंदाने राहावें.

**तें साधावें कवणे रिति । जेणें होय नित्यतृप्ति । तें युक्ति ऐकावी सुनिश्चितीं । एकाग्र होऊनी ।4-6।**

ज्या ज्ञानानें नेहमीं चित्त तृप्त असतें, तें ज्ञान कोणत्या युक्तिनें साधावें, हें आतां सांगतो. ती खात्रीची युक्ति एकाग्र मन करून ऐका.

**परि आधीं सांगों साधन । आत्मस्वरूपाचें परिज्ञान । ते जाणितल्याविण । काय ध्यावे ।4-7।**

पण प्रथम आत्मस्वरूपाचें (जीवाचें) ज्ञान होण्याचें साधन सांगतों,कारण, प्रथम आपण कोण हें समजल्याखेरीज त्या परमात्म्याचें ध्यान आपणास कसें करतां येईल ?

**आधीं आत्मयातें जाणावें । मग तयातें साधावें । येरवी नुसतें अनुभवावें । काय धरूनी ।4-8।**

अगोदर आपलें ज्ञान करून घ्यावें, आणि नंतर परमात्याचें साधन करून घ्यावें. त्या शिवाय आत्मसुखाची कल्पना कशावरून करितां येईल ? (जीव हा दुःखमय आहे. असें ठरल्याखेरीज ब्रह्मज्ञान सुखमय आहे, याची कल्पना कशी करतां येईल ?)

**ज्या युक्ति स्वरूप एक । जाणणें ते बुध्दि ऐक । मी आहे हें तव निष्टंक । जाणसी तूं ।4-9।**

ज्या युक्तिनें तें एक स्वरूप आहे असें जाणवयाचें आहे, ती युक्ति ऐक. ' मी आहें ' एवढें मात्र तुला अगदीं

स्पष्टपणें समजत आहे.

**ऐसे तव जाणसी । परि मी कोण हें नेणसी । तरि कां आपआपणासी । बुझेसिना ।4-10।**

मी आहें एवढें मात्र जाणतोस, पण मी कोण आहें हे मात्र जाणत नाहींस. तर बाबा,असा तूं स्वतःसच कां बरें विसरून गेलास?

**तू कोण कोठूनि कैंचा । आला गेलासि तरि साचा ।**
**परि पालव न धरिसी विचाराचा । आपणा जाणावया ।4-11।**

तूं कोण ? कोठून आलास ? अनेक वेळां आलास व अनेक वेळां गेलास ! तरि स्वतःसंबंधानें ज्ञान करून घेण्याचा विचार कधीच केला नाहींस

**तूं देह कीं देहाचा जाण। देह तुज जाणे कीं तुज याचें ज्ञान। पाहतां द्रष्टा तू आपण। देह तुज दृश्य।4-12।**

तूं देह, कीं देहाचा तूं कोणी आहेस ? देह तुला ओळखतो, कीं तूं देहाला ओळखतोस ? विचार करून पहातां तूं (जीव) द्रष्टा (पहाणारा) आहेस आणि देह हा तुला दृश्य (दिसणारा) आहे.

**देहा सबाह्य अभ्यंतरिं । तूं जाणशी गा विचारीं । देह अहंकाराचे परि । मिरविशी तूं ।4-13।**

बाबारे, तूं जर विचार करून पाहिलास, तर देह हा आंतून बाहेरून कसा आहे, याचें ज्ञान तुला होईल. जसा एकादा दागिना अंगावर घालावा, त्याप्रमाणें हा देह आहे.

**लेवोनि खोळि पंचभूतांची । भूतीं मिरविशी तूंचि । जाणिव असे की याची । तुजचि कीं ।4-14।**

बाबारे, हें पंच महाभूतांचें एक पांघरूण घेऊन तूं त्या पंच महाभूतांमध्येच (तुझ्या भंवतालीं असणा-या इतर देहधा-यांमध्यें) मिरवत आहेस. पण आपला देह कसा आहे, याचें कांहीं तुला ज्ञान आहे का ?

**ऐसे आपणियां जाण । निरसीं हा दृश्य गुण । जें देह मी म्हणतोसि आपण । ते सांडी भ्रांती ।4-15।**

या रीतिनें आपलें ज्ञान करून घे. देह हा दृश्य आहे, व मी त्याला पहाणारा द्रष्टा वेगळा आहे, असें समजून देह तोच मी, ही कल्पना सोडून दे. देह तोच मी, अशी तुला निव्वळ भ्रांती झालेली आहे.

**देहाचिया अवयवां समस्तां । तूंचि एक जाणता । तो तुझा तूं आइता । विचारूनि पाहिं ।4-16।**

या देहाला अवयव किती आहेत, हें तुझें तुला समजतें. यावरून देह तुझा, व तूं देहावेगळा, हें विचार करून पक्कें समजून घे.

**रोम त्वचा नाडी मांस । अस्थि हे पंच अंश । कठिण हा धरणीचा भास । जाणशी तूं ।4-17।**

केंस, कातडें, शिरा, मांस व हाडें, हें पंच कठिण पदार्थ तुझ्या शरीरांत आहेत, (हे सगळे मृत्तिकारूप आहेत) म्हणून हे पृथ्वीचा अंश होत, हें तुला ठाऊक आहे.

**लाळ मूत्र शोणित । मज्जा रेत हें आप द्रवत । या पांचां अंशांते निश्चित । जाणता तूं ।4-18।**

लाळ, मूत, रक्त, मेद आणि रेत, हे पांच पदार्थ तुझ्या शरीरांत आहेत. (ते पातळ असल्यामुळें) उदकाचा अंश आहेत, हें तुला पक्कें माहित आहेच.

**क्षुधा तृषा आळस निद्रा । मैथुन हे अंश वैश्वानरा । या पांचांचिया व्यवहारा । जाणशी तूं ।4-19।**

भूक, तहान, आळस, नीज व मैथुन, हे गुण तेजाचे आहेत. यांचा व्यवहार तर तुझ्या ध्यानांतच आहे.

**चलन धावन निरोधन । प्रसरण आणि आकुंचन । हे चंचळ पांचही गुण । वायुचे देखना तूं ।4-20।**

हालणें, धावणें, अडणे, पसरणें, व लहान होणें, हे चंचळ धर्म आहेत व हे पांचही धर्म वायुचे आहेत, हें तूं पहातच आहेस.

**काम क्रोध शोक जाण । लोभ भय हे पांच गुण । तें आकाशाचें लक्षण । देखना तूं ।4-21।**

काम, क्रोध, शोक, लोभ आणि भय हे जे पांच गुण तुझ्या अंगी आहेत, ते आकाशाचे गुण आहेत, हे तर तुला दिसत आहे.

**ऐसे पंचभूतांचे अंश । जाणसी पंचविस । तें सर्वही तुज दृश्य । स्थूल देह हा ।4-22।**

याप्रमाणें प्रत्येक भूताचे पांच पांच प्रमाणें पांच भूतांचे मिळून पंचवीस गुण तुझ्यामध्यें आहेत, व ते तुला दिसत आहेत. बाबारें, हे गुण ज्याचे ठायीं आहेत, तो स्थूल देह होय.

**याचे साही विकार जाण । जायते अस्ति विवर्धन । विपरिणमते वार्धक्य संहरण । यासीच असे ।4-23।**

या सर्व देहाला आणखी सहा विकार होतात ते हे, उत्पन्न होतो--असतो, वाढतो, पक्व होतो, वृध्द होतो, आणि मरतो. हे सर्व विकार या स्थूल देहालाच आहेत.

**याचें वर्णव्यक्तिरूपासी । जाणशी याचिया नामासी । म्हणोनि तुज आत्मयासी । हे विजाती कैंची ।4-24।**
तसेंच या देहाचा रंग (काळा कीं गोरा) कसा आहे. हे तू जाणतोस.याचें नांव काय हें तूं ओळखतोस. म्हणून तुझें जीवात्म्याचे व तुजहून विजातीय असलेल्या त्या देहाचे ऐक्य कसें बरें होईल ?
**तूं आत्मा निराकार । जाणसी या देहाचा आकार । जरि काष्ठीं अग्नीचा संचार । तरिं वेगळा कीं ।4-25।**
तूं जीव निराकार आहेस. आणि देहाचे सर्व आकार तुला दिसतात. लांकडांमध्यें अग्नि गुप्तरूपानें असतो, म्हणून तो काय वेगळा समजायचा ?
**तैशा तूं यासि व्यापुनी । असशी या स्थूळातें भरूनी । रोमांच आदि अग्र करूनी । जाणता तूं ।4-26।**
त्याप्रमाणें तूं या स्थुळ देहाला व्यापून भरून राहिला आहेस. तुला या देहाच्या केसांचे अग्र देखील स्पष्ट समजतें.
**परि हे तुज नेणे । तूंचि अससी जाणपणें । तो तूं आत्मा आपण । नव्हेसी नरनारी ।4-27।**
पण हें शरीर मात्र तुला जाणत नाहीं. तूं त्याला जाणतोस. असा जो तूं जाणता, तो तूं पुरूष किंवा स्त्री नाहींस. ( पुरूषत्व स्त्रीत्व हे धर्म देहाचे ठायीं मात्र असतात.)
**आत्मा याचेनि जागेपणें । बाह्य व्यापार करणें । इंद्रियाद्वारा भोगणें । विषयाचें घडे ।4-28।**
बा जीवा, तूं जेव्हां जागा असतोस, तेव्हां शरीराच सर्व व्यापार घडत असतात. तूंच इंद्रियांच्या साधनानें अनेक प्रकारच्या विषयांचे उपभोग घेतोस.
**मी अमुका नामरूपाचा । ऐंसा अभिमान विश्वाचा । तूं जाणता या सर्वांचा । विलक्षण आत्मा ।4-29।**
बाबारे, मी अमक्या रूपाचा, माझें नांव अमकें, हा जो अभिमान आहे, तो विश्वसंज्ञक अभिमानाचा आहे. पण ज्या अर्थी देह कोण, अभिमानी कोण हें तुला समजतें, त्या अर्थी तूं या सर्वांच्या पलिकडचा असा आहेस.
**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते स्थूलदेहनिरसन नाम चतुर्थं प्रकरणं संपुर्णम् ।**

---

**प्रकरण पांचवें - लिंगदेह निरसन.**

**त्वचेंतूनि स्पर्श घेणें । तुज श्रवणांतूनि ऐकणें । नयनांतूनि देखणें । नाना रूपातें ।5-1।**
तूं कानांनी ऐकतोस, कातडीच्या योगानें तुला कोणी स्पर्श केला असतां तो समजतो; तूं डोळ्यांनी अनेक प्रकारचीं रूपें पहातोस.
**जिव्हेंतूनि स्वाद घेसी । घ्राणांतूनि परिमळ जाणशी । वाचेंतूनि उच्चारिसी । अक्षरें सर्व ।5-2।**
तूं जिभेनें रस चाखतोस; नाकानें वासाचा अनुभव घेतोसः वाणीनें सर्व अक्षरें उच्चारतोस.
**करांतूनि देणें । पायांतूनि चालणें । शिश्नातूनि रति भोगणें । गुदीं मळविसर्ग ।5-3।**
हातांनीं देतोस किंवा घेतोस, पायांनीं चालतोस, शिश्नानें रतिसुखाचा उपभोग घेतोस, गुदद्वारानें मळाचा त्याग करतोस.
**या इंद्रियांतूनि तूंचि जाण । प्रकाशसी आड ठाकोन । तो तूं विलक्षण । साक्षिरूप ।5-4।**
पण या दहाहि इंद्रियांच्या आड राहून तूंच हीं सर्व कामें त्या इंद्रियांकडून करवित असतोस. पण तूं या इंद्रियांहून वेगळाच असून साक्षिरूपानें त्यास पाहणारा आहेस.
**श्रवण स्पर्शन दर्शन । आस्वादन अवघ्राण । या ज्ञानेंद्रियें करून । सकळ पांचही विषय ।5-5।**
ऐकणें, स्पर्श करणें, पहाणें, रूची घेणें आणि हुंगणें, या कर्मांच्या इंद्रियांना ज्ञानेंद्रिये म्हणतात. या इंद्रियांनीं पांचही विषय घेतां येतात.
**शब्द स्पर्श रूप रस गंध । वचनादान गमनानंद । मळविसर्ग हे पंचविध । कर्मेंद्रियां जाणता तूं ।5-6।**
शब्द, स्पर्श, रूप, रस व गंध हे त्या ज्ञानेंद्रियांचे विषय आहेत. बोलणें, घेणें, देणें, आनंदाचा उपभोग घेणें व मळाचा त्याग करणें, हीं कर्मे करण्याच्या इंद्रियांस कर्मेंद्रियें असें म्हणतात. हीं कर्मेंद्रियें तुझ्याच ताब्यांत आहेत.
**प्राणापानव्यान । उदान आणि समान । यांची स्थानें स्थिति संपुर्ण । जाणसी तूंचि एक ।5-7।**
प्राण, अपान, व्यान, उदान व समान, या प्राणांची किंवा वायुचीं स्थानें व कर्मे काय आहेत, तीं तुला एकट्यालाच माहित आहेत.
**अंतःकरण मन बुध्दि। चित्त अहंकार या पांचां भेदि । स्फरशी जाणसी तूं या आदि । ठाईचाचि उभा ।5-8।**

## परमामृत

अंतःकरण, मन, बुध्दि, चित्त, अहंकार, या पांच भेदांनीं तूं जरी भासत असतोस, तथापि तूं या पलिकडचा आहेस, आणि या सर्वांच्या पूर्वीचा आहेस.

**अंतःकरणींचा आठवा सपुर । वरि उठती वृत्तिचे उद्‌गार । तयासि जाणे तो अक्षर । सिध्दची असे ।5-9।**

अंतःकरणाचीं स्मरणशक्ति लहान असते, आणि त्यापासून क्रोध, मोह वगैरे विकारांची उत्पत्ति होत असते. ह्या अंतःकरणास जाणणारा तो अक्षर (परमात्मा) तो वेगळाच आहे.

**वृत्तिचें स्फुरण झालें । तया मागुनि जाणणें उठिलें । हें म्हणोनये पहिलें । आइतेंचि असे ।5-10।**

काम क्रोधादि वृत्तींची उत्पत्ति प्रथम झाली, आणि नंतर ज्ञान उत्पन्न झालें असें म्हणूं नये. ज्ञान हें प्रथमचेंच असून तें आपोआपच उत्पन्न झालेलें आहे. (तें स्वयंभू आहे.)

**अंतःकरणवृत्तिचें स्फुरण। तें संकल्पविकल्पात्मक मन। तेंचि निश्चयात्मक म्हणोन। बुध्दि म्हणविजे ।5-11।**

अंतःकरणावर उत्पन्न होणा-या ज्या कामक्रोधादि वृत्ति, त्यांचे ज्ञान ज्याला होतें तें मन होय. तें संकल्पविकल्पात्मक (शंकारूप) आहे.तेंच ज्या वेळीं निश्चयात्मक होतें, तेव्हां त्याला बुध्दि असें म्हणावें.

**निश्चयात्मक जो अर्थु । तेथें अनुसंधानात्मक हेतु । तें चित्त हें जाण तूं । तत्प्रवृत्ति तो अहंकारु ।5-12।**

बुध्दिनें निश्चय करून जो अर्थ घेतला, त्याच अर्थाच्या ठिकाणीं अनुसंधान ठेवणारें, तें चित्त होय, हें तूं समजून ठेव. अशा प्रकारच्या चित्ताची जी प्रवृत्ती ( अनुसंधानपूर्वक विषयांचें ग्रहण ) त्याला अहंकार म्हणावें.

**ऐसी अंतःकरणपंचकस्फूर्ति । तूंचि जाणसी स्वयंज्योति । यालागिं स्वसंवेद्य मूर्ती । आत्मा तूंची ।5-13।**

या प्रकारें करून अंतःकरण पंचकाची उत्पत्ति आहे, हें तूं स्वतः जाणतोस म्हणून, तुला स्वसंवेद्य ( स्वतःच्या वृत्ति स्वतः जाणणारा ) आत्मा असें म्हणत असतात.

**जैसा कापुसापासूनि निघे दोरा।तोचि तया भासे दुसरा।तैसे मन बुध्दि चित्त अहंकारा।होणेंस्वरूपापासुनी।5-14।**

याला उदाहरण पहाः- कापसापासून सूत उत्पन्न होतें. तें सूत उत्पन्न होतांच कापसाहून वेगळें दिसूं लागतें. त्याचप्रमाणें एकाच स्वरूपापासून उत्पन्न झालेलीं मन, बुध्दि, चित्त व अहंकार हीं त्या मूळच्या स्वरूपापासून वेगवेगळीं भासू लागतात.

**तो पीळ नुकलितां दोरा । म्हणावा परि कापुस खरा । उकलितां नुकलितां दुसरा । भासु नाहीं ।5-15।**

जोपर्यंत पीळ उलगडला नाही, तोंपर्यंत तें सूत आहे, असें त्यास म्हणावें, पण तो खरोखर कापुसच आहे, पीळ काढलेला असो किंवा नसो, तेथें कापसावांचून दुसरा पदार्थ असतच नाहीं.

**नातरि उदकाचा तरंग । तेथें दुसरा नाहीं भाग । तो विरालिया चांग । उदक उदकीं ।5-16।**

किंवा दुसरें उदाहरण पहा. पाण्यावर तरंग उठतो, पण तो कांहीं पाण्याहून वेगळा असत नाहीं. तो तरंग नाहीसा झाला, म्हणजे उदकांत उदक मिसळून एकरूप होऊन जातें.

परि जळावांचोनि कांहीं । आणिक विजातिय नाहीं ।

**तैसें मन माघारे आत्मयाचे ठायीं । तंव तें नाहींच होय।5-17।**

उदक व तरंग असे दोन पदार्थ जरी वेगळे भासत असले, तरी तेथें उदकाहून निराळा असा कोणताच पदार्थ असत नाहीं. त्याप्रमाणेंच मन जेव्हां उलट माघारें आत्म्याकडे येतें, तेव्हां तें आत्म्यामध्यें मिसळून एकरूपच होऊन जातें; म्हणजे नाहीसें होतें.

**तो तरंग का दोरा । उठवी पीळ आणि वारा । तैसा हा लिंगदेहाचा उभारा । कारण माया करि ।5-18।**

उदकावर तरंग उत्पन्न होतो, तो वायुमुळें आणि कापसाचा दोरा बनतो, तो पिळामुळें. त्याप्रमाणेंच हा सूक्ष्म देह आहेसा दिसतो खरा, पण तो मायेनेंच उत्पन्न केलेला आहे.

**उकललीया कां मुरलिया । पीळ वारा जाय लया । तैसी आत्मज्ञानें कारण माया । मिथ्या होय ।5-19।**

जसा दोरा उलगडला किंवा तरंग नाहीसा झाला, म्हणजे पीळ व वायु यांचा आपोआप नाश होतो, त्याप्रमाणेंच

आत्म्याचें ज्ञान झाले, म्हणजे सूक्ष्म देह भासविणारी जी माया, ती व्यर्थ होते. (कार्याचा नाश झाला असतां कारणाचाही नाश होत असतो, असा न्याय आहे.)

**तरंग जळ दोराकापुस।ऐक्य होता जाय दूजा भास। तैसें होय मन स्वरूपीं समरस । तेथें अज्ञान हारपे ।5-20।**

## परमामृत

उदक आणि तरंग, किंवा दोरा आणि कापुस, यांचें ऐक्य झालें, म्हणजे मग दुजेपणाचा भास देखील होत नाहीं. त्याप्रमाणेंच मन एकदां आत्म्याशीं एकरूप झालें, म्हणजे द्वैतरूपी अज्ञानाचा नाश होतो.

**असि हे स्फूर्ति कल्पना । बोलिजे लिंगदेह अंतःकरणा । तेथें स्वप्नावस्था जाणा । वासनामय ।5-21।**

आतां आत्म्याला स्फूर्ति कशी होते, ही कल्पना (तूर्त) राहूं दे, अंतःकरणादिकालाच लिंगदेह असें म्हणावें. याला स्वप्न ही अवस्था असते व ती अवस्था केवळ वासनारूपच असते.

**मन प्रवर्ते इंद्रियद्वारें । तें वासना अभ्यंतरिं विवरे । तैं स्वप्नावस्था मांडे । श्रुत दृष्ट आभास ।5-22।**

मन पूर्वी इंद्रियाच्या द्वारानें जे कांहीं उद्योग करतें, तीच वासना त्या मनामध्ये गुप्त रूपानें असते. बाबारे, अशा प्रकारें स्वप्नाची अवस्था उत्पन्न होते. ही स्वप्नावस्था म्हणजे पूर्वी ऐकलेल्या किंवा पाहिलेल्या विषयांच्या आभास रूपानें असते. (म्हणजे पूर्वी ऐकलेले किंवा पाहिलेले विषय स्वप्नामध्यें भासत असतात.)

**तैजस अभिमानी दृश्य । या इतुकीया ओळखींस । असे अंतःकरणीं चिदाभास । व्यापक तो ।5-23।**

या स्वप्नावस्थेचा जो अभिमानी त्याला तेजस असें म्हणावे. अशा प्रकारचे ज्ञान व्हावयास अंतःकरणामध्यें चिदाभास व्यापक रूपाने असतो.

**जैसा आदित्य लोहिपडे अग्नी। तो नव्हे काय दिनमणी।**
**तैसा बिंबला जो अंतःकरणीं । तो स्वयं प्रकाश ।5-24।**

याला उदाहरणः- सूर्याच्या किरणांचा लोहामध्ये प्रवेश झाला असतां तें लोखंड अग्नीनें तप्त झाल्यासारखेंच भासतें. पण तो सूर्याचा गुण नव्हे कीं काय ? त्याप्रमाणें जो अंतःकरणादिकामध्यें शिरलेला दिसतो तो स्वयंप्रकाश असा आत्मा नव्हे कीं काय ?

यांत तुझी एक जाणिव नाहीं । तरि हें इत्यादि न स्फुरे कांहीं ।
**यालागिं चिदाभासें आभास पाहिं। भासविला।5-25।**

बाबारे, तुझ्या ठिकाणीं जी एक ज्ञानशक्ति आहे, ती नसती, तर हीं अंतःकरण वगैरे तुला समजली असतीं काय? म्हणून सांगतो. तुझ्या ठिकाणीं जे ज्ञान आभास रूपाने आहे, त्या ज्ञानाने तुला भासविले आहे.

**तुझी एक जाणिव खंडे । तरि कांहीं न मांडे । तेथें तुवांचि उरिजे अखंडें । स्वस्वरूपें ।5-26।**

जर ती तुझी तेवढी ज्ञानशक्ति नाहीशी झाली, तर तुला हे कांहीच समजणार नाहीं. यासाठी तूं एकटाच अखंड अशा तुझ्या स्वतःच्या ज्ञान स्वरूपानेंच बाकी (शिल्लक) रहा.

**तूंचि स्फुरशी बोलशी । अंतरिचें अंतर जाणशी । तूंचि पाहें तुजशीं । विचारूनियां ।5-27।**

बाबारे, तूंच हें सगळें बनतो आहेस. बोलतोस, ऐकतोस, मनांत काय आहे हें जाणतोस. आपला आपणाजवळचा विचार करून पहा म्हणजे हें तुझ्या ध्यानांत येईल.

**जयाचेन प्रकाशें । अंतःकरण प्रकाशे । जो निजतेजें स्फुरतसे । ते जाण तूंचि ।5-28।**

ज्याच्या प्रकाशाच्या योगानें अंतःकरण प्रकाशित होतें (स्पष्ट दिसूं लागतें) जो स्वतः आपल्याच तेजानें स्फुरण पावत असतो, तो तूंच आहेस हें समजून घे.

**तेचि जाणिव धरूनि उल्हासे । तरि नसतेंचि दृश भासे । ते ते जाणिव निरसे । तैं आत्मा लाभे ।5-29।**

पण बाबारे, ही जी तुझ्या ठिकाणीं जाणिव (ज्ञानशक्ति) आहे तिच्यामुळेंच हें सगळे मूळचें कांहींच नसता प्रत्यक्ष दिसत असल्याप्रमाणें भासते. पण जेव्हां कांहीं तुझी जाणिव नाहींशी होईल, तेव्हांच आत्म्याचा लाभ होईल.

**जाणिवेचिये वेळे । जें तियेपुढें आभासिलें । तें दृश्य म्हणोनि त्यजिलें । तेथें उरलें तेंचि उरलें उरे ।5-30।**

जाणिव जागृत असतां जें तिला समजत असते, ते सर्व दृश्य (आणि म्हणून नाशवंत होय.) त्या दृश्याचा त्याग केला, म्हणजे आत्मस्वरूपच बाकी रहाते.

**जें जें भासे जाणिविये । तें तें जरि निरसूनि जाये । तरि जाणिवचि आहे । तेचि पाहे तियेतें ।5-31।**

जाणिवेला जें जें दिसतें, तें तें जर खोटें असें समजून टाकून दिलें, तर फक्त नुसती जाणिवच बाकी राहिल, व तीच स्वतः आपण आपणास पाहील.

**ते जाणिव आत्मयाची प्रभा । तो स्वयंभू तियेतें उभा । दीप आपुलिया शोभा । आपण जैसा ।5-32।**

ही जी ज्ञानशक्ति ती आत्म्याचा प्रकाश होय. आत्मा हा स्वतःच सिध्द आहे. ज्याप्रमाणें दिवा तेवत असतां तो आपणच प्रकाशित करीत असतो त्याप्रमाणें.

**दृश्य मृगजळ आभासन । तें करुनियां निरसन । तूं पाहें बा कवण । आपण ऐसें ।5-33।**
दृश्य म्हणून जेवढे तेवढें मृगजळाप्रमाणें भासरूपच आहे, असें समजून सर्व दृश्याचा त्याग करून नंतर आपण कोण, याबद्दल तुझा तूंच विचार पहा.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते लिंगदेह निरसनं नाम पंचमं प्रकरणं संपुर्णम् ।**

---

**प्रकरण सहावे कारणदेह निरसन.**

**नेणें म्हणशी ते नेणिव । तो मिथ्या भ्रम भाव । रूपासरिखा अवयव । छायेस जैसे ।6-1।**
तूं आपणास कांहीं समजत नाहीं असें जें म्हणतोस ती नेणिव (अज्ञान) होय. पण तो नुसता भ्रम आहे. याला उदाहरणः- ज्या प्रकारचें मूळच्या पदार्थाचें रूप असेल, त्याचप्रमाणें त्याची छाया असते. पदार्थाला जे अवयव असतात तेच छायेलाही असतात.

**आप आपणिया जाणता । सदैव असे सर्वथा । नातरि न कळण्याची अवस्था । कवण सांगे ।6-2।**
आपण आपणांस नेहमीं पूर्णपणें जाणत असतो. असें जर नाहीं म्हणावे, तर मला हे कळत नाहीं असे जेव्हां आपण म्हणतो, तेव्हां न कळणें हे जे ज्ञान तें कोणास होते असे म्हणावयाचें ?

**आप आपण जाणता निकें । तेथें नेणिव आड ठाके । तरि इयेचें पारखे -। पण कवण सांगे ।6-3।**
खरोखरच पाहिलें तर आपण आपणास पहातच असतो, पण मध्यें थोडेसें अज्ञान आडवें येतें. जर आपण आपणास जाणत नसतों तर नेणिव म्हणून कांहीं तरी आहे, असा त्या नेणीवेचा परकेपणा तरी आपणास कशानें कळता ?

**नकळे ऐसें जाणवलें। तें न कळण्याशि नाहीं कळलें। म्हणोनि नेणणें जया विवळे। तोचि जाण आत्मा ।6-4।**
मला हे कळत नाहीं असें जें आपणास समजलें, ते कांहीं आपल्या ठिकाणच्या अज्ञानास समजलें नाहीं, ज्ञानासच समजलें. म्हणून हे ज्या ज्ञानास समजलें, तोच आत्मा ही खूण ठेव.

**आपुलिया जाणिवा । धरिशी नेणिवभावा । याकारणें तो गोवा । पडे जयाचा तयासी ।6-5।**
वास्तविक आपण ज्ञानी असतांहि अज्ञानी आहों असें मानीत असतो, म्हणूनच प्रत्येकाचीं ही अशी गुरफट झालेली असते.

**आप आपलिया नकळे हे नेणिव । ऐसें म्हणावें तोचि जाणिव भाव । म्हणोनियां नेणिव । मिथ्या भ्रांती ।6-6।**
बरे, आपले ज्ञान आपणास कळत नाहीं, असे जरी म्हटले, तरी तेहि ज्ञानच होय. यासाठीं नेणिव (अज्ञान) म्हणून जें कांहीं आहे असे आपण समजतो, तो केवळ मिथ्या भ्रम आहे.

**नेणिव जरि जाणिली । तरि तेथें नेणिव मिथ्या झाली । तेथील जाणिव उरली । आत्मप्रभा ।6-7।**
जर त्या नेणिवेचे ज्ञान झालें, तर ती मुळी नेणिवच नाहींशी झाली. आणि फक्त जाणिव मात्र उरली. तोच आत्म्याचा प्रकाश होय.

**तूंचि आपण नेणशीं । ऐसें तूंचि जाणशीं । तरि नेणिवे गुंतसी । नाथिलाची ।6-8।**
बाबारे, तूंच आपणास जाणत नाहीं, असे जाणतोस मग उगाच असा अज्ञानांत कां बरें गुंततोस ?

**तूं आत्मा स्वयंप्रकाश । तेथें नेणिव ही मिथ्या भास । तो निरसतां तूं अविनाश । स्वतः सिध्द ।6-9।**
बाबारे, तूं स्वयंप्रकाश असा आत्मा आहेस. तुझ्या ठिकाणीं जे अज्ञान भासते तो खोटा भ्रम आहे. तो भ्रम एकदा घालवून टाकलास म्हणजे तूं स्वतः सिध्द व कधींहि ज्याचा नाश होत नाहीं असा आत्माच झालास.

**या सर्वासि जो जाणे । तो काय आपणातें नेणे । नेणिवेस तरि कळणें । असेचिना ।6-10।**
अशा प्रकारचे सर्व विचार ज्याला कळतात, तो काय आपमच आपणास विसरेल ? कारण जे अज्ञान म्हणून ठरलें, त्या ठिकाणीं ज्ञान असणें शक्यच नाहीं.

**ऐसें नेणिव तेंचि कारण । कार्य स्थुळ सूक्ष्म जाण । तिये कारण सुषुप्तीचें लक्षण । ऐक आतां ।6-11।**
इतका वेळेपर्यंत ज्या नेणिवेबद्दल विचार सांगितला ती नेणिव म्हणजे कारणदेह होय स्थूल देह व सूक्ष्म देह हीं तिचीच कार्ये आहेत. यासाठीं (हा विषय तुझ्या नीटपणें लक्षांत यावा म्हणून) सुषुप्तीचें (निद्रेचे) लक्षण आतां सांगतों तें ऐक.

**मन प्रवर्तें इंद्रियद्वारे । बाह्यविषयीं वावरे । ते जागृति हें खरें । जाणिजे तु ।6-12।**
मन इंद्रियांच्या द्वारानें, कर्मे करण्यास प्रवृत होऊन बाह्य विषयांशीं व्यवहार करीत असतें. ह्या स्थितिला

जागृति असें म्हणतात. हे तुला ठाऊकच आहे.

**तो आभास घेऊनि अंतरि । मन सूक्ष्म कल्पना करी । तेधवां स्वप्नावस्था वरि । मांडे तेथें ।6-13।**

जे विषय जागृतित घडले, त्यांचा आभास (कल्पना) आपल्यामध्यें घेऊन मनाच्या सूक्ष्म कल्पना चालत असतात, अशा प्रकारच्या ह्या स्थितिस स्वप्नावश्था असें म्हणतात.

**परि जाणिव दोहींची एक । ते आपणिया करी निःशेख। तेव्हां सुषुप्ती अवश्था देख । अज्ञान गडद ।6-14।**

पण जागृति व सुषुप्ति या दोन्ही अवस्थेमध्यें जी एक ज्ञान शक्ति असते, ती जेव्हां (आपणच) नाहींशी करून टाकतें, तेव्हां सुषुप्ति (निद्रा) ही अवस्था असते. त्यावेळीं जीवाला अगदीं गाढ अज्ञान असतें.

**ते नेणिवचि आहे जाणिव । परि धरिला विपरित भाव । आप आपणा नाठव । अज्ञानवशें ।6-15।**

जें जें अज्ञान, तेंच ज्ञान आहे. पण, आपण आपला उलटा समज करून घेतों, अज्ञानामध्यें आपण अगदीं गुरफटून गेलों असल्यामुळें आपला आपणास विसर पडतो.

**आप आपणा विसरलीं । मग प्रपंचाचा आभास कल्पूं लागली । मी जीव हीच भली । सुषुप्तीसी ।6-16।**

हे सर्व जीव आपणच आपणास विसरून गेले आहेत. व त्या विस्मरणामुळेंच ह्या प्रपंचाच्या कल्पनेंत पडले आहेत. मी जीव जो भ्रम - हें जे अज्ञान - तेंच या सुषुप्तीचें (निद्रेचें) कारण आहे.

**ते नेणिव जैं फिटे । तैं स्वयंभस्वरूप उमटे । जैसे किडाळ जळलियापुढें । शुध्द राहे ।6-17।**

हें अज्ञान ज्यावेळीं नाहींसें होईल. त्याच वेळी स्वतः सिध्द आत्म्याचें ज्ञान होईल. याला उदाहरणः- ज्याप्रमाणें सोन्यांतील हीण जळून गेलें, म्हणजे आपोआपच शुध्द सोनें तेवढें बाकी राहतें, त्या प्रमाणें.

**नेणिवे पासाव उगवता । अभिमान होय धरिता । तो प्राज्ञ हे व्यवस्था । कारणदेहाची ।6-18।**

या अज्ञानापासून उत्पन्न होऊन त्या अज्ञानावस्थेचा (निद्रेचा) अभिमान धरणारा तो प्राज्ञ होय. ही कारणदेहाची व्यवस्था झाली.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते कारणदेह निरसनं नाम षष्ठं प्रकरणं संपुर्णम् ।**

---

**प्रकरण सातवें  महाकारणदेह निरसन.**

**हा अवघा दृश्याकार । भासे जाणिवेसमोर । तो निरसूनि तूंचि उर । ज्ञानस्वरूप ।7-1।**

तुझ्या ज्ञानशक्तिसमोर जेवढा म्हणून दिसणारा आकार (अनेक प्रकारचा व्यवहार) आहे, तेवढा सर्व मिथ्या आहे असें मानून त्याचा त्याग करून केवळ ज्ञानस्वरूप असा तूं बाकी रहा.

**नेणिवेच्या नेणिवभावा । तूंचि जाणसी स्वयमेवा । ते जाणिव धरूनि आपलिया खेवा । आपण रिगावें ।7-2।**

अज्ञानाचा अज्ञपणा तूं स्वतःच जाणतोस. हे जे तुझे जाणणें, तीच जाणिव होय. जाणिवेचा दृढ आश्रय करून तूं तिच्यामध्यें प्रवेश कर.(ज्ञान स्वरूप हो.)

**आप आपणासि जाणतां । नेणिव आहे कीं आतां । स्वयेंचि होऊनि ज्ञाता । निरशीं नेणिव ।7-3।**

अशा रीतिनें तूं आपणच आपणास जाणू लागलास म्हणजे मग नेणिव कोठें राहिली ? या साठी तूं स्वतः ज्ञानवंत होऊन नेणिवेचा (अज्ञानाचा) त्याग कर.

**नेणिव जेथें निरसली । तेथें जाणिव राहिली एकली । ते निजदृष्टि बोलिली । आत्मरूप ।7-4।**

ज्या ठिकाणच्या नेणिवेचें निरसन झालें तेथें फक्त एक जाणिव मात्र राहिल. तिलाच (त्या जाणिवेलाच) आत्मरूपाचें दर्शन होतें.

**जो आपलिया जाणिवा । जाणे प्रपंचा सर्वा । तया आपणा जाणावया गोवा । पडे नेणिवेचा ।7-5।**

जो जीव आपल्या जाणिवेच्या योगानें जगांतील सर्व प्रपंचाचें ज्ञान करून घेतो, त्याच जीवाला स्वतःचे ज्ञान करून घ्यावयास, मध्यें अज्ञानाची आडकाठी येते.

**ते नेणिव फिटे गुरुखुणा । जाणे आपण आपणा । बोलिजे या अनुसंधाना । महाकारण ऐसे ।7-6।**

गुरुनें खूण सांगून ज्ञान करून दिलें, म्हणजे त्या अज्ञानाचा नाश होतो. आणि जीव आपण आपणास जाणूं लागतो. अशा प्रकारची जी अंतःकरणाची स्थिति, तिला महाकारणदेह असें म्हणावें.

**फिटूनियां नेणणे । आप आपणा जाणणें । तिहीं देहाचेनि साक्षिपणें । महाकारण देह ।7-7।**

अज्ञान नाहीसें होऊन, आपलें आपणास ज्ञान होऊन, स्थूल, सूक्ष्म, आणि कारण असें तिन्ही देह ज्याला साक्षिपणानें पहातां येतात. त्याला महाकारण देह असें म्हणतात.

## परमामृत

**तिहीं अवस्थांचें जाणपण। तियेशी तूर्या अवस्था ऐसी खूण। तिहीं देहाचें जें अवलोकन ।
तें महाकारण देह ।7-8।**

जागृति, स्वप्न व निद्रा या तिन्ही अवस्थांचें ज्ञान ज्या अवस्थेंमध्यें होतें. त्या अवस्थेस तूर्या (चवथी अवस्था) असें म्हणतात.या अवस्थेतून तीनही देहांचे ज्याला अवलोकन करतां येतें तो महाकारणदेह होय.

**मी सर्वसाक्षि आपण । हा प्रत्यगात्माचा अभिमान । सर्वांचें जेथें खुंटलें स्फुरण । तें शुध्दस्वरूप ।7-9।**

मी स्वतः तिन्ही देहांहून वेगळा असून, त्या देहांना साक्षिरूपानें पहातों, अशा प्रकारचा अभिमान ज्याला असतो, त्याला प्रत्यगात्मा असें म्हणावें. विश्व, तैजस, प्राज्ञ व प्रत्यगात्मा या चारी अभिमान्यांचें ज्ञान ज्या ठिकाणीं कुंठित होतें, तें शुध्द असें आत्मास्वरूपच होय.

**कार्यकारणाचें कारण।यालागीं बोलिजे महाकारण। कार्यकारण झालिया शून्य।महाकारण कवण म्हण।7-10।**

कार्य (स्थूल व सूक्ष्म देह) व कारणदेह यांना उत्पन्न करणारा हा देह आहे. म्हणून याला महाकारण देह असें म्हणतात.(आत्मज्ञान होऊन ) कार्य व कारण या दोहोंचा नाश झाला म्हणजे महाकारण तरी राहणार कसा ? (कार्यनाशानें कारणचानाश होतो, असा सिध्दांत आहे.)

**आहे स्वयंभू आपण । जाणं आपलि आपण खूण । परब्रह्म निर्वाण । निजस्वरूप ।7-11।**

आपण स्वयंभू आहों, आपण कोण हे आपणास जाणतां येतें, अशी जी स्थिति, तेंच परब्रह्म, तोच मोक्ष व तेच आत्मस्वरूप होय.

**ऐसें आपुलें अनुसंधान । करितां होय विज्ञान । प्रपंचाचें मिथ्यापण । प्रत्यया ये ।7-12।**

अशा प्रकारच्या अनुक्रमानें आपणास विचार करतां येऊं लागला म्हणजे विज्ञान शास्त्रानें सांगितलेल्या गोष्टिचा अनुभव आपणाला येतो. आणि मग प्रपंच मिथ्या आहे, ही गोष्ट अनुभवाला येते.

**मी शुध्दात्मा आपण । ऐंसा वर्ते जो अभिमान । तयाचाही साक्षि कवण । तुजवांचोनि ।7-13।**

मी शुध्दात्मा आहें, अशा प्रकारचा जो अभिमान उत्पन्न होतो, त्या अभिमानाचा साक्षि तुझ्याहून दुसरा कोण असणार

**म्हणोनि जाणिवेचें निजज्ञान । तें शुध्दस्वरूप आपण । सर्व निरसीं परिपूर्ण । निजात्मा तूं ।7-14।**

यासाठी जाणिवेचें जें ज्ञान (विज्ञान) हेंच आपलें शुध्द स्वरूप आहे, नेणिव आणि जाणिव यांचा निरास झाला, म्हणजे तूंच आत्मरूप आहेस, (असें तुला विज्ञान होईल.)

**ज्ञान जेथुनि स्फुरावे । तें आपणचि स्वभावें । ऐसें स्वरूप अनुभवावें । जाण पैं गा ।7-15।**

जेथून ज्ञान उत्पन्न होतें तेंच आत्मस्वरूप आहे.या स्वरूपाचा तुला अनुभव घ्यावयाचा आहे, ही गोष्ट लक्षांत ठेव.

**जेथे जाणिव खुंटे । तें तुझें स्वरूप नेटेंबोटें । घनानंद चढे ना वोहटे । अपरमित ।7-16।**

ज्या ठिकाणीं जाणिवेची मजल खुंटली, तेंच अगदी निःसंशय तुझें स्वरूप होय. या स्वरूपाचेच ठिकाणीं अपरमित (मोजतां न येणारा) असा आनंद आहे, तो कधीं अधिकही होत नाहीं, आणि कधीं कमीहि होत नाहीं.

**जें अमर्याद अमुप । तें जाणिजे आपेआप । अविनाश स्वरूप । अखंडित ।7-17।**

जे अमर्याद, आणि अमुप (मोजतां न येण्यासारखें) आहे, त्याचें आपण ज्ञान करून घ्यावें. तें स्वरूप कधीही नाश न पावणारें आणि कोठेंही न तुटलेलें असें आहे.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते महाकारणदेह निरसनं नाम सप्तमं प्रकरणं संपुर्णम् ।**

---

### प्रकरण आठवें - शून्य - खंडण

**जरि तें शून्य भाषिजे । तरि कल्पूनि नाम ठेविजे । जें आपण आपणा सूजे । तें शून्य कीजे ।8-1।**

(कित्येक नास्तिक मतवाद्यांच्या मताप्रमाणें संपूर्ण जगाची उत्पत्ति शून्यापासून झाली आहे. परंतु हें मत खोटें आहे. हें सिध्द करण्यासाठीं या प्रकरणाचा प्रारंभ झाला आहे.) जर या जगाच्या उत्तप्तिला शून्य कारण आहे अशी कल्पना करावी, तर तें योग्य नाही. कारण,आपणास ज्याची कल्पना करतां येते, ज्याला नांव देतां येतें, ज्याचें आपणास ज्ञान होतें, तें शून्य (काहीं नाहीं) असें म्हणता येईल ?

**जो सर्व शून्यातें जाणें । तया शून्य ऐसें कवण म्हणे । जें काहीं नाहीं तेणें । आपणा केवीं जाणिजे ।8-2।**

**परमामृत**

जो सर्व शून्याला जाणतो, त्याला शून्य कोणी म्हणावें ? जें मुळीं स्वतःच कांहीं नाहीं, त्यानें आपणच आपणास कसें जाणावें ?

**जिया स्वरूपीं नुरे दृश्य । दृश्यासि दृष्टत्व अदृश्य । जयाचें तयासीच प्रकाश । स्वस्वरूप सदा ।8-3।**

ज्या स्वरूपाच्या ठिकाणीं दृश्य म्हणून कांहीं उरतच नाही, कारण जें दृश्य त्याला द्रष्टत्व अदृश्य असते. हें जें आत्मस्वरूपच आहे, तें ज्याचें त्यालाच दिसून येतें.

**सर्वही निरसूनि जाणिव । उरलें सांडून नेणिव । तया ज्ञाना जाणावया भाव । न स्फुरे कांहीं ।8-4।**

हें जें आत्मस्वरूप आहे, तें सर्व ज्ञानाचा निरास करून आणि अज्ञानाचा नाश करून राहिलेलें आहे. यासाठीं, त्या ज्ञानस्वरूपाला जाणण्यास योग्य असा दुसरा कांहींच भाव असत नाहीं.

**म्हणोनि अभाव ऐंसा भासे । परि शून्य म्हणावें कैसें । जें सर्वांसि जाणोनि असे । शून्यासमवेत ।8-5।**

म्हणून हें ज्ञानस्वरूप स्पष्ट असूनहि तें नसल्याचा भास होतो. पण त्याला शून्य असें नांव कसें बरें देतां येईल कारण, तें जें ज्ञान तें शून्यासहित सर्वांस जाणणारें आहे.

**शून्यातें शून्यपण । जाणिव कल्पी आपण । तें स्वरूपी होय लीन । शून्यसहित ।8-6।**

शून्याच्या ठिकाणीं शून्यच आहे हें ज्ञानाच्याच योगानें कल्पिलें जातें. पण तें ज्ञानसुध्दां शून्यासहित आत्मस्वरूपीं लीन होतें.

**तें शून्य ना जाणिव । दृश्य ना नेणिव । ज्ञप्तिमात्र भरिव । स्वस्वरूप । 8-7।**

तें (ब्रह्म) शून्य नव्हे, आणि जाणिवही नव्हे, तें दृश्यही नव्हे, किंवा नेणिवही नव्हे, तें केवळ ज्ञप्तिरूप (ज्ञानरूप) असें स्वतःचेंच अनिर्वाच्य (सांगता न येण्याजोगें) असें रूप आहे.

**जें निरंतर निर्मळ । ज्ञानघन केवळ । चिदाकाश अखिळ । अगोचर ।8-8।**

तें सर्वदा निर्मळ (स्वच्छ) आहे, केवळ घनदाट असें ज्ञानच आहे, तें इंद्रियांनीं न समजणारें असें चिदाकाश आहे.

**जेथें शून्य दृश्याकार । अज्ञान निरसूनि अनिवार । जें सूक्ष्माहूनि सूक्ष्म सपुर । निजज्ञान ।8-9।**

जेथें शून्य हें दृश्याच्या आकारें होतें (ज्या दृष्टिला शून्य म्हणून कांहीं आहे असें समजतें,) ज्याच्या ठिकाणचें सर्व अज्ञान नाहींसे झालेले असते, जें अगदी सूक्ष्म पदार्थाहून सूक्ष्म असतें (केंसाच्या अग्राचे दहा हजार भाग कल्पून त्यांतून एक भाग तितका सूक्ष्म होईल त्याहून सुध्दां सूक्ष्म.) ते आत्मज्ञान (ब्रह्म) होय.

**जें निष्कलंक ज्ञानाकाश । करि शून्याकाशाचा ग्रास । तो निजद्रष्टा स्वयंप्रकाश । परमात्मा तूं।8-10।**

जें अत्यंत निर्मल असें ज्ञानरूपी आकाश आहे, ज्यानें सर्वव्यापी अशा शून्यालासुध्दां गिळून टाकले आहे, जें सर्व ठिकाणीं स्वतःच्या प्रकाशाचेच स्वरूप असतें, अशा प्रकारचे जें ब्रह्म (परमात्मा) तो तूंच आहेस.

**तो तूं निरालंब साक्षि । निर्लेपक सर्वपक्षी । पारावाररहित निरीक्षीं । देखना तूं होऊनी ।8-11।**

तर अशा प्रकारचा जो तूं , तो पहाणारा हो, आणि निरालम्ब, (आदाररहित) , साक्षि, निर्लेप (मलरहित) ज्याच्या स्वरूपाचें पूर्णपणें आकलन करतां येत नाहीं, अशा परमात्म्याला पहा.

**जे ज्ञानाचें जिव्हार । आस्तिकाचें घर । सुखाचे सागर । घनानंद तू ।8-12।**

तें आनंदस्वरूप ज्ञानाचें रहस्यं आहे, तें आस्तिकांचें (विश्वासठेवणाराचें) घर आहे, तें म्हणजे एक सुखाचा समुद्र आहे, आणि अशा प्रकारचा जो अत्यानंदरूपी परमात्मा तो तूं आहेस.

**सर्वसाक्षिचें दीपन । प्रकाशाचें कोंदण । जें आत्मानंदाचें निधान । ते कैवल्य तूं ।8-13।**

सर्वसाक्षि अशा त्या स्वरूपाचा लखलखाट जें सर्व प्रकाशाचें कोंदण, (ज्यांत सर्व प्रकाश गच्च भरून राहिला,) जें आपणास होणा-या आनंदाचा ठेवा आहे, असें जें कैवल्य (ब्रह्म किंवा मोक्ष) तें तूंच आहेस.

**जें सकळ निरासें शुध्दबुध्द । जेथें नुरे त्वं पद । सरे तत्पद शुद्द । असि पदेंसी ।8-14।**

सर्व दृश्य पदार्थाचा निरास केल्यामुळें अत्यंत शुध्द आणि ज्ञानस्वरूपच आहे, ज्या ठिकाणीं त्वंपद बाकी रहात नाहीं, तत् पदाचें असि पदासुध्दां कारण रहात नाहीं.

**ऐंसा तूं परमात्मा । परि तुझा त्वां हारविला महिमा। आतां मिळुनि राहिजे निजधामा । कैसिया परि ।8-15।**

अशा प्रकारचा परमात्मा, तो तूंच आहेस. पण बाबा रे, तूं आपला थोरपण हरवून टाकिला आहेस. यासाठी, तूं पुनः आपल्या पूर्व ठिकाणीं कोणत्या प्रकारानें राहशील ?

**तो लक्ष्यांश अनुवादणें । परिसावा शुध्द अंतःकरणें । नित्य जैसे अभ्यासणें । तैसें सांगू ।8-16।**

तें सांगतों. तो (उपदेश) तत्त्वमसि इत्यादि महावाक्यांचा लक्षांश आहे, तो तूं अंतःकरणानें शुध्द होऊन ऐक आणि जें सांगत आहों, त्याचा तूं नेहमीं अभ्यास कर.

**जेणे स्वरूपी निश्चय बैसे । शुध्द परमात्मा प्रकाशे । सदा चित्त रमोनि समरसे । कैवल्यामाजी ।8-17।**

म्हणजे त्यापासून आत्मस्वरूपाचा निश्चय होईल. शुध्द परमात्म्याचें ज्ञान होईल, आणि त्या मोक्षसुखामध्यें तुझे मन सदोदित निमग्न होऊन आनंद पावेल.

**इति श्रीपरमामृते मुकुंदराजविरचिते शून्य - खंडनं नाम अष्टमं प्रकरणं संपुर्णम् ।**

------------------------------------------

**प्रकरण नववें - निदिध्यासन**

**तरि हें सांगितल्यापरि । तें स्वरूप निर्धारिं । मग ऐंसाच अभ्यास करीं । नित्यनेमेंसा ।9-1।**

यासाठी मागें सांगितल्याप्रमाणें त्या आत्मस्वरूपाचा प्रथम निश्चय कर आणि मग नेहमी नियमपूर्वक असाच अभ्यास कर.

**पाहिजे एकांतस्थान । जेथें चंचळ न होय मन । सकळ वृत्तितें आवरून । बैसावे तेथें ।9-2।**

प्रथम एकांत स्थान पहावें. तें असें असावें, कीं तेथें मन चंचल होऊं नये. अशा ठिकाणीं, काम, क्रोध वगैरे ज्या अंतःकरणाच्या वृत्ति आहेत, त्या सर्व नाहीशा करून स्वस्थ बसावें.

**करूनि विषयाची निवृत्ति । चित्तासि प्रत्यगावृत्ति । धरीं दृशमात्रीं विरक्ति । त्यागबुध्दि ।9-3।**

प्रथमतः संपूर्ण विषयांपासून मन मागें फिरवावें. प्रत्येक दृश्य पदार्था संबंधानें वैराग्य व त्यागबुध्दि असावी.

**बैसोनि आसनीं सावकाशें । अंतरामाजी प्रवेशे । एकवटीं इंद्रियद्वारीं बैसे । मनोवृत्ति जे ।9-4।**

नंतर आसनावर शांतपणानें बसावें. आणि इंद्रियांच्या ठिकाणी जी सदोदित मनाची वृत्ति जडलेली असते, ती तेथून सोडवून आंत आंत मन शिरवावें.

**सांडुनि अभिमान स्थूळाचा । भाव धरि अंतराचा । अभाव करूनि सर्वांचा । गगन पाहिं ।9-5।**

स्थूल देहाचा अभिमान सोडून द्यावा. आणि त्याहून आंत असणारे जे लिंग, कारण वगैरे देह त्यांचा विचार करावा आणि हळुहळू त्या सर्वांचाहि (मागे प्रकरण 4 ते 7 यांमध्यें सांगितलेल्या देहांचा) त्याग करावा, आणि आकाशाचें चिन्तन करावें.

**स्थुळ इंद्रियांमधून । युक्तिनें एकवटी मन । अंतराकाशीं नेऊन । स्थिर करीं ।9-6।**

स्थूल देह व त्याचा आश्रय करून राहणारी जी इंद्रियें, त्यांजपासून मन काढून घेऊन युक्तिनें तें चिदाकाशामध्यें नेऊन स्थिर करावें.

**जे वृत्ति बाहेर धांवे । तियेतें परतोनि आणावें । येणें अभ्यासें स्थिरावे । आपोआप ।9-7।**

जी जी मनाची वृत्ति प्रबल होऊन धावूं लागेल, तिला परत आणावयाची, अशा प्रकारचा अभ्यास - मनोनिग्रह केला, म्हणजे मन आपोआप स्थिर होतें.

**नातरि जिकडे मनाची राहटी। न लागावें तयाचे पाठी। माघारि घालोनियां दृष्टि। स्वस्वरूपेंसी ठेविजे ।9-8।**

अथवा ज्या विषयावर मन जात असेल, त्या विषयाच्या पाठीस लागूं नये. आपली दृष्टि आपल्या निजस्वरूपाच्या ठिकाणीं ठेवावी.

**मन जो जो विषय धरि । तो तो विविकें विदारीं । तरि तें स्थिरावे अंतरि । सांडूनि कल्पना ।9-9।**

मन ज्या ज्या विषयाची इच्छा धरिल तो तो विषय विवेकानें विदारून टाकावा. ( विवेकानें त्या विषयाचा बाधक प्रमाणांनी विचार करून तो विषय तुच्छ करून सोडून द्यावा.) असें केलें तरच तें मन स्थिर होऊन आपल्या सर्व कल्पना सोडून देईल.

**तेथें ह्रदयाकाशीं । मीपण स्फुरे जीवाशी । तेंचि विवेकेंशी । पाहिजे जंव ।9-10।**

अशा रीतिनें ह्रदयाकाशामध्यें जीवाच्या मीपणाचाही जर सावकाशपणें विचार पाहिला तर !

**तंव तें निरालंबी स्फुरे । पुनरपि तेथेंचि मुरे । तरि जीवदशा बारे । नास्तिक्यत्व पावे ।9-11।**

पुनः तें मन ( जीवत्वाचा अभिमान सोडून ) चैतन्यामध्यें स्थिर होतें, आणि पुनः तें तेथेंच मुरून जातें. असें झालें म्हणजे बाबा रे, ती (मनाची) जीवदशासुध्दां आपोआपच नाहींशी होते.

**नदी उगमीं स्थिरावे। तरि सिंधूपण कां न पावे । तैसें जीवाचें ब्रह्म कां न व्हावें । या स्थिति राहतां ।9-12।**

नदी जर उगमाशीं शांत व स्थिर प्रवाहाची होईल, तर तिला शेवटीं समुद्रपणा कां बरें येणार नाहीं ? तसा

## परमामृत

नेहमीं जीव शांत व स्थिर अशा स्थितींत राहिला असतां शेवटीं ब्रह्मपणा कां बरें प्राप्त होणार नाहीं? (होईलच.)

**म्हणूनि परतावें अभ्यंतरिं । अभ्यास करावा ऐशियापरि । मग कल्पना अभ्यंतरिं । समरसोनि जाय ।9-13।**

यासाठीं बाह्य विषय टाकून मनाला अंतर्मुख करावें, आणि याप्रमाणें अभ्यास करावा, म्हणजे मनाची सर्व कल्पनाशक्ति आत्मस्वरूपाशीं अगदीं एकवटून जाते.

**सोडून स्थुळगती । ऐशी राहे अंतर स्थिति । तोंवरीं अभ्यास निगुती । करावाचि लागे ।9-14।**

स्थूल पदार्थापासून मन परावृत होऊन अशाप्रकारें आत्मस्वरूपीं राहिलें नाहीं, तोंपर्यंत वारंवार-दृढ निश्चयानें अभ्यास करावाच लागतो.

**तेथें जें जें स्फुरे । तें तें सोडून होई माघारें । ज्ञानस्वरूप निर्धारें । आपण होईजे ।9-15।**

मनामध्यें जो जो विषय उत्पन्न होईल, तो तो सोडून देऊन माघारें वळावें, म्हणजे खात्रीनें आपलें मन ज्ञानरूप परमात्म्याशीं एकवटून जाईल.

**देखणेंचि देखण्यावरि । परतोनि राहे जरी । तरि दृश्याकाराउरि । कैसेनि होय ।9-16।**

जो देखना (पहाणारा, द्रष्टा) तो जर नेहमीं देखनारासच (आपणासच) पहात राहिल, तर त्याला बाकीचे इतर दृश्य पदार्थ दिसत असावे, असें होईल तरी कसें ? (कारण एकाच वेळीं एकाकडून दोन क्रिया होत नाहींत असा सिध्दांत आहे.)

**साकारादि आघवें । शून्य होय स्वभावें । तेथ आपण पाहावें । आत्मास्वरूप ।9-17।**

अशी अंतर्मुख वृत्ति झाली म्हणजे, ज्याला म्हणून कांहीं तरी आकार आहे असें दृश्य पदार्थ आपोआपच दिसत नाहीसें होतात आणि अशी जी निर्विकार वृत्ति तेथेंच आपण आपलें स्वरूप पहावें.

**जैसें वाढलिया नीर । नुरे कांहीं आकार । अंतःकरणादि व्यवहार । तैसा होय।9-18।**

जसें महापूर आला असतां त्यांत सर्व पदार्थ बुडून गेल्यामुळें त्यांचे स्वरूप दिसत नाहींसे होतें, आणि एक उदक मात्र जिकडे तिकडे दिसत असते, त्याप्रमाणें प्रकार इकडेहि होतो. अंतःकरणाचा व्यापार केवळ ज्ञानमय होऊन त्यामध्ये सर्व दृश्य जग बुडून जातें.

**जैसें कूर्में आंकुचन केलें । करचरण शिर अंतरि नेलें । मग आपणिया आपण उरले । अखंडित।9-19।**

कांसव आपले हात, पाय, डोकें हे अवयव आपल्याच अंगांत आंत ओढून घेतें, आणि जसें एकाद्या निर्जीव पदार्थाप्रमाणें होऊन राहतें, त्याचप्रमाणें मन बाह्यविषयांपासून मागे फिरून, अंतर्मुख झालें, म्हणजे त्यास कोणतेंहीं कर्तव्य राहत नाहीं, आणि तें आपणच आपल्या ठिकाणीं राहतें.

**जाणिव याचि परि । प्रवेशतां अंतरि । तेथें येकलीच उरे उरि । आपणियाची ।9-20।**

अशा प्रकारें ज्ञान होऊन आंत आंत प्रवेश होत चालला म्हणजे, शेवटीं आत्मस्वरूप मात्र एकटें अवशिष्ट राहतें.

**आपण एकीं एकला । दुजा नाहीं देखिला । ज्ञानमात्र संचला । आत्माराम।9-21।**

आणि आपण फक्त एकटे एकच आहों, दुसरें कांहीं दिसत नाहीं, जिकडे तिकडे आपले ज्ञानस्वरूपच भरलेलें आहे असें पाहून ( तो मुक्त झालेला जीव) आत्मसुखाचा अनुभव घेत असतो.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते निदिध्यासन नाम नवमं प्रकरणं संपुर्णम् ।**

---

### प्रकरण दहावें - दृश्यभास - खंडण

**ऐंसा उमज न होतां । अज्ञान गडदामाजी पडतां । न कळे म्हणोनि भ्रमतां । वेड लागे ।10-1।**

अशा प्रकारचें ज्ञान न होतां, आणि उलट अज्ञानामध्यें गुरफटून गेलें असतां जर, आत्मस्वरूपाचा कोणी विचार करूं लागेल, तर त्याच्या बुध्दिस भ्रम उत्पन्न होऊन त्याला उलट वेड लागेल.

**तो भ्रम आपणचि वाहे । नाथिलें अज्ञान धरूनि राहे । वायां संदेहीं पाहे । न कळे म्हणोनी ।10-2।**

(जिला ज्ञान करून घेण्याचें सामर्थ्य आहे) ती बुध्दिच आपणास भ्रम पडला आहे, असें नसतेंच अज्ञान घट्ट धरून राहिलेली आहे. आणि आत्मस्वरूप आपणांस समजत नाहीं, म्हणून ती विनाकारण संशयांत मात्र पडली आहे.

**उजेडींचा घरांत आला । तंव दृष्टि आंधार भरला । डोळे असोनि अदेखना झाला । आपणाशि तो ।10-3।**

## परमामृत

जसा एकादा पुरूष बाहेरच्या लख्ख उजेडांतून घरांतील काळोखाच्या जागेंत आला म्हणजे डोळे दिपून गेलेले असल्यामुळें, डोळे असूनही तो आंधळा झाल्याप्रमाणें होतो, त्याप्रमाणें होतो, त्याप्रमाणें हा प्रकार आहे.

**कां निशीचिया दोन प्रहरीं । डोळियां गडद पडे भारी । तैसा अज्ञान आंधारीं । गुतों नको ।10-4।**

किंवा दोन प्रहर रात्र झाली असतां - भर मध्यरात्री - ज्याप्रमाणें डोळे असून देखील त्यापुढें गडद अंधारच पडलेला असतो, व आपणास अंधकारांत बुडून गेल्याप्रमाणें वाटतें, त्याप्रमाणें आपली स्थिति करून घेऊं नको. (अज्ञानांत गुरफटूं नको.)

**तैसे मनासि जे जे कल्पणें । तें तें सन्मुख देखणें । दृश्या निरसोनि राहणे । स्वस्वरूपीं निश्चलत्वे ।10-5।**

या अज्ञानावस्थेंत तूं असलास, म्हणजे मनामध्यें तूं जी कल्पना करतोस, तें तें तुला तुझ्यापुढें आहे, असें दिसूं लागतें. पण त्या अज्ञानाचा त्याग करून संपूर्ण दृश्य पदार्थांचा निरास कर. आणि अगदी संतोषानें आत्मस्वरूपी रहा.

**बोले आपण आपणाशी। अंतरि आपणां आपण उपदेशी ।**
**पाहे तया विवेकासी । कांहीं आकार असे ना ।10-6।**

जेव्हां कोणी एकदा पुरूष आपणच आपणाशीं बोलत असतो, किंवा आपल्या मनाला आपणच उपदेश करीत असतो, तेव्हां त्याची स्थिति काय असते, याचा विचार कर. त्या पुरूषाच्या त्या भाषणाचें किंवा विचाराचें स्वरूप कोणास उगमत नाहीं.

**जेथूनि उपजे विवेकमातू । पाहे तव अंतःकरणांतु । तेंहि धरूनि जाणिव हेतु । जाणतें होय ।10-7।**

आपल्या अंतःकरणांत नीट विचार करून विवेकाची उत्पत्ति कोठें होते, तें शोधून पहा. त्या अंतःकरणानें ज्ञानाची इच्छा धरिली तर तें ज्ञानयुक्त होईल.

**देहासहित ब्रह्मांड शून्य । झालिया उरे परिपूर्ण । कांहीं न दिसे स्थानमान । कवणे ठायीं ।10-8।**

या आपल्या देहासहवर्तमान सर्व ब्रह्मांड जर शून्य झालें, तर जिकडे तिकडे एक ज्ञानस्वरूपच बाकी राहिल. दुसरें तिसरें कांहीच दिसणार नाहीं.

**साकार हा त्रिलोकु । नेणो काय झाला सकळिकु । संचलो मी एकाएकू । चिदाकाशे।10-9।**

अनेक प्रकारचे आकार असलेलें हें त्रैलोक्य कोणीकडे गेलें आणि त्याचे काय झालें, हेंच कळत नाहीं, फक्त एक मीच जिकडे तिकडे ज्ञानस्वरूपानें भरून राहिलों आहें.

**अंतर बाह्य परिपूर्ण । शून्य झालें दृश्याचें भान । असणें आपणिया आपण । एकत्वरहित ।10-10।**

विचारानें मनास समजणारे किंवा इतर इंद्रियास स्पष्ट दिसणारे असें जे विषय त्यांविषयीं शून्यबुध्दि उत्पन्न झाली म्हणजे मग आत्मस्वरूप मात्र बाकी राहतें. आणि मग त्याखेरीज दुसरें कांहींच नसल्यामुळें त्याच्या एकटेपणाची कल्पना होणें शक्य नाहीं.

**तेथें आंधारी गेली । मनबुध्दि मावळली । आत्मप्रभा उजळली । चिदादित्याची ।10-11।**

अशी स्थिति प्राप्त झाली म्हणजे, अज्ञानाचा अंधकार नाहींसा झाला. मन किंवा बुध्दिहि नाहीशीं झालीं आणि ज्ञानाच्या सूर्याचा उदय झाला.

**येणें परि स्थूळाचा । प्रवृत्त मोडला जागृतिचा । आतां निरास लिंगदेहाचा । तैसाच कीजे ।10-12।**

ज्याप्रमाणें जागृतिमध्यें प्रवृत होणा-या स्थूल देहाचा निरास करावयाचा त्याप्रमाणें लिंगदेहाचाही निरास करावा.

**स्फूर्ति स्फुरे जेथुनी । तें पहिलेंचि असे अस्फूर्तिपणीं । मज देखतां उमटोनी । मावळे स्फूर्ति ।10-13।**

जर करतां तेथून स्फूर्ति उत्पन्न होते, तर तेथें ती पहिल्यानें नव्हती, असें उघडच होतें. ही स्फूर्ति आपल्या देखत उत्पन्न होऊन नाहींशी होऊन जाते.

**तू तये स्फूर्तिचा जाण । संकल्पविकल्पात्मकाचे जीवन । निश्र्चयाचें कारण । तूंचि असें ।10-14।**

त्या स्फूर्तिचा तूं अंतःकरणरूपी जाणता आहेस. संकल्पविकल्परूपी मनही तूंच आहेस, निश्चयात्मक बुध्दिचेंहि कारण तूंच आहेस.

**अनुसंधान पूर्वीच असे।म्हणूनी तें उपजतां तुज दिसे । अहंता तुझेनी आंगे वसे । तेंहि तूंचि जाण ।10-15।**

अनुसंधान तरी पूर्वीचेंच आहे, म्हणून चित्तरूपानें तें उत्पन्न होतांच तें तुला दिसतें. तसेंच तुझ्या ठिकाणीं अहंता आहे. हेंहि तूं जाणतोस.

## परमामृत

**ऐसें पांचां भेदि अंतःकरण । हेहि तूचि स्फुरें जाण । तें सांडितां काय तूजविन । वेगळें पडे ।10-16।**
याप्रमाणें अंतःकरण, मन, बुध्दि, चित्त व अहंकार हें अंतःकरण तुझ्याच स्फूर्तिचा परिणाम आहे. तें एकदां टाकून दिलें, म्हणजे मग तुझ्याखेरीज दुसरें काय बरें शिल्लक राहिल ?
**जळें तरंग केविं सांडावा। आकाशें वायु केविं दवडावा। तेवि तुझ्या स्फुरतीभावा। कैसेनि दवडिजे ।10-17।**
उदकानें आपल्या ठिकाणीं असणारा तरंग कसा बरें टाकावा ? आकाशानें वायूचा त्याग कसा करावा ? त्याचप्रमाणें तुझ्या ठिकाणीं असणारा जो स्फुरण पावण्याचा धर्म, तो कसा बरें नाहींसा होईल ?
**तरंग जळीं विरे । वायु गगनी मुरे । तैशी तुझी स्फुरती नुरे । तुजमाजी ।10-18।**
याचें उत्तर ऐक. तरंग पाण्यामध्येंच नीहींसा होतो, वायु आकाशांतच नीहींसा होतो. त्याप्रमाणें तुझें स्फुरण तुझ्याच ठिकाणीं नाहीसें होईल.
**झाडीतां आपला हात । आंगासि असे जडित । तैसी अंतःकरणास्फूर्ति मूर्तिमंत । कैशी सांडशी ।10-19।**
आपला हात टाकून द्यावा असें जर म्हटलें, तर तो आंगास चिकटलेला आहे. तो जसा टाकतां यावयाचा नाहीं, त्याप्रमाणेंच अंतःकरणाची स्फुर्ति अंतःकरणास चिकटून असल्यामुळें, ती तुला कशी बरें सोडून देतां येईल ?
**सांडू पाहशी तंव तेचि स्फूर्ति।करू पाहसी तंव तेचि वृत्ती। विचारू पाहसी तंव तेच मती।मन चित्तें ।10-20।**
जर ती सोडून देणयाचा यत्न करशील, तर तो यत्न देखील (अंतःकरणरूपी) स्फूर्तिच होय. जें काय करू पाहशील, तीच मनाची वृत्ति होय. विचार करूं लागशील तें बुध्दिचें कार्य होय. या गोष्टिचा विचार करून पहा.
**चिंतूं पाहशी तंव तें चित्त । मी म्हणतां अहंकार होत । उगचि असतां स्वस्थ । स्वस्थता स्फुरे ।10-21।**
चिंतन करशील तें चित्त, मी असें म्हणशील तर तो अंहकार होय. बरे, स्वस्थ असावें, असें म्हणशील तर ती स्वस्थता ही देखील एक वृत्ति नव्हे कां ?
**जरी उगाचि असता । तरि कां आठवूं स्फुरता । संकल्प विकल्प करिता । कासयासी ।10-22।**
जर तूं स्वस्थ राहिला असतास, तर तुला आठवण तरी कशी झाली असती ? संकल्प किंवा विकल्प कशाला उत्पन्न झाले असते ?
**एक निश्चय धरिता । तरि कां पुनः पुनः चिंतिता । देहत्वें कां आंगवता । मी म्हणोनी ।10-23।**
तुझा जर कांहीं तरी निश्चय असता, तर तुला पुनः पुनः विचार कशाला करावा लागता ? व मग तुला देह हा मी असें म्हणण्याची वेळ कां बरें आली असती ?
**म्हणोनी हें असतचि सरे । ऐसें वर्म आहे बा रे । तें ज्ञान नसतें तरि अहंकारें । केंवि उठिजे ।10-24।**
यासाठीं ज्या ठिकाणीं सर्व असत् पदार्थ नाहींसे होऊन जातात, तें ठिकाण कांहीं वेगळेंच आहे. जर कांहीं ज्ञान म्हणून पदार्थ नसता, तर अहंकार तरी कोठून उत्पन्न झाला असता ?
**आठव चित्तीं जो राहे । तें ज्ञान नव्हे तरि काय ? । ज्ञानेंविण स्थिरत्व आहे । बुध्दिस कोठें ।10-25।**
मनामध्यें जी एक आठवण म्हणून असते, तें ज्ञान नव्हे, तर दुसरें काय ? ज्ञान नसेल तर निश्चय हा जो बुध्दिचा गुण, तो तिच्या ठिकाणीं येऊन तिला स्थिरत्व तरी कोठून येणार ?
**तें ज्ञान जरि अधिष्टान।तरि संकल्पविकल्पात्मक मन। तेंचि ज्ञान परिपूर्ण।या लागीं स्फुरण असेना।10-26।**
तें ज्ञान जर अधिष्ठान (इतर वृत्ति जेथें राहतील अशी जागा) असेल, तर तेंच संकल्पविकल्परूप मन होईल.पण तें जर ज्ञान पूर्ण असेल तर त्या ठिकाणीं कोणत्याहि प्रकारचा विकार असणार नाहीं.
**ते स्मरतां नये स्मरण । स्मरण जयाचें विस्मरण । तें ज्ञान ना अज्ञान । ज्ञप्तिमात्र जें ।10-27।**
तर अशा प्रकारचें जें शुध्द ज्ञान, तें कधीं आठवून आठवत नाहीं. विस्मरण हेंही स्मरणच आहे, (विसरूं लागल्यास विसरतां येत नाहीं.) तें ज्ञानहि नाहीं आणि अज्ञानहि नाहीं असें तें न सांगतां येण्यासारखें आहे.
**कांही वृत्तिभास भासे । तो स्फुरतांचि तया दिसे । परि स्वतः आपण असे । निराभास ।10-28।**
जो थोडा, कांहीं वृत्तींचा भास भासतो, तो भासल्याबरोबरच त्याला दिसून येतो. तथापि तें स्वतः भासरहित असेंच आहे.
**तो निराभास म्हणावा कवण । तेचि तया असे जाण । जाणिवही जिरवून । आगींचे आंगिं ।10-29।**
पण निराभास असें तरी कोणास म्हणावें ? कारण ज्ञानस्थितींत तें एकटें एकच आहे. त्यानें ती जाणीव

(ज्ञानशक्ति) आपल्या अंगीं जिरवून टाकिलेली आहे.

**या लागीं जाणिव ना नेणिव । भाव ना अभाव । तेंचि तें स्वयमेव । स्वस्वरूप ।10-30।**

यासाठी तें ज्ञानरूपहि किंवा अज्ञानरूपहि नाहीं. तें भावरूपहि नाहीं व अभावरूपहि नाहीं. ज्याचें तें - स्वतः एकटेंच - असें नाहीं.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते दृश्यभास - खंडनं नाम दशमं प्रकरणं संपुर्णम् ।**

---

**प्रकरण अकरावें - अज्ञान - खंडण**

**आपण आपणासि नेणें । ऐसें आपणचि जाणे । जाणपण हें नुमजणें । तेंचि पै तें ।11-1।**

आपण आपणास जाणत नाहीं, हें तरी आपणच जाणतो, म्हणून जें ज्ञान तेंच अज्ञान होय. तेंच तें स्वतः आहे.( ज्ञान आणि अज्ञान हीं दोन्ही एकच आहेत.)

**नेणिवेच्या ग्रासें । जाणिव उरली दिसे । तेचि तेथें वसे । ऐसें केविं घडे ।11-2।**

पण असें कसें होईल ? अज्ञानाला नाहींसें करून ज्ञान तर बाकी राहिलेलें दिसतें. मग ज्ञान आणि अज्ञान हीं एकच आहेत, असें कसें म्हणावें ?

**जाणिव नेणिवा । दोहींविरहित भावां। दोहीं बीजा बोलावा । विस्तारिता तो ।11-3।**

तो आत्मा जाणिव व नेणिव या दोन्ही भावांहून अगदीं निराळा आहे. जाणिव आणि नेणिव या दोहोंच्याहि बीजांचा विस्तार व्हावयास लागणारा ओलावा तोच आहे. आणि त्यांचा विस्तार करणाराही तोच आहे.

**तो जाणिवा नेणिवा । नातुळे दोन्ही भावा । आधींच असे तो जाणावा । स्वरूपानंद ।11-4।**

तो जो आत्मस्वरूपाचा आनंद आहे, तो जाणिव किंवा नेणिव या दोन्ही स्थितिंत सांपडत नाहीं. तो मूळचाच आहे.

**कांहींच न स्फुरतां आदिं । जें स्थळ असे अनादि । जे ज्ञानाची फुंदि । ज्ञप्तिमात्र ।11-5।**

त्याच्यापूर्वी कांहींच असूं शकत नाहीं, म्हणून तें स्थल अनादि आहे.तें ज्ञानाचें घर आहे. तें केवळ ज्ञानस्वरूपच आहे.

**जें निष्कलंक ज्ञानघनांद । आपणचि आपण स्वतःसिध्द । निजस्वरूप विशुध्द । स्वसंवेद्य ।11-6।**

तें अत्यंत शुध्द असें जें ज्ञान त्याचा घनदाट भरलेला असा आनंदच आहे. तें स्वतःच सिध्द असल्यामुळें केवळ आपलें आपणच आहे. त्याशिवाय दुसरें काहींच नाहीं. तें अत्यंत शुध्द असें आपलेंच स्वरूप आहे. आणि तें आपणच आपणास जाणणारें आहे.

**जें जाणणेंचि जाणणें । म्हणूनि नाहीं तेथें नेणणें । ते आपआपणा एकपणे । जाणें ना नेणें ।11-7।**

त्याला एक ज्ञान मात्र माहित आहे, म्हणून तेथें अज्ञान मुळींच नाहीं. तें आपलें आपण एकटें असल्यामुळें, तें जाणतहि नाहीं, किंवा अज्ञानीहि असत नाहीं.

**तें परिपूर्ण एकलें । म्हणोनि दिसावें हें खुंटलें । घनानंद कोंदाटलें । स्वस्वरूप ।11-8।**

कारण तें एकटेंच परिपूर्ण आहे, म्हणून त्याला दिसावें, असें म्हणतांच येत नाहीं. कारण तें अतिशय आनंदानें खच्चून भरलेले आहे. ते स्वस्वरूप आहे.

**दिसतें तें दुसरें । तेंहि तेथें सरे । मग देखणेंचि उरे । तेंचि तया केविं दिसे ।11-9।**

कारण, जो पदार्थ दिसतो, तो दुसरा असतो, तसला कांहीं पदार्थ तेथें नाहीं. फक्त पाहाणारें असें ते एकटेच आहे. असें असल्यामुळें त्यानें आपणासच कसें पहावें ?

( डोळा इतर पदार्थ पहातो. तो स्वतः आपणासच पाहूं शकत नाहीं, त्याप्रमाणें आत्मस्वरूप असा मुळीं एकच पदार्थ या जगांत भरलेला असल्यामुळें, पाहाणारा व पहावयाचा पदार्थ असा मुळीं भेद होणेंच शक्य नाही.)

**तें देखणेंचि देखणें । म्हणोनि तयासि तें पाहणें । जें जाणवलें तें निरसणें । उरे तेंचि ।11-10।**

जें पाहाणारें तेंच पाहणारे. म्हणून तें (जर कांहीं पाहूं लागेल, तर तें) आपणासच पाहत असतें. कारण जें जें समजेल, त्याचा त्याचा त्याग करावयाचा आहे, अर्थात् जेथें ज्ञानाची मजल संपते, तेंच बाकी उरणार.

**दृश्य द्रष्टा दर्शन । या तिन्ही भावां विलक्षण । एकलेंचि आपण । ज्ञप्तिमात्र ।11-11।**

दृश्य (पहाण्याचा पदार्थ), द्रष्टा (पहाणारा), दर्शन (पहाण्याची क्रिया) या तीनहि स्थितींहून ते वेगळें आहे. ते केवळ ज्ञानस्वरूप असून एकटेच आहे.

## परमामृत

**दृश्य दर्शन हरपे । तेथें उरिजे स्वस्वरूपें । अखंडित आपआपें । निरामय ।11-12।**

दृश्य व दर्शन हीं नाहींशीं झालीं, म्हणजे मग केवळ आत्मस्वरूपच बाकी उरते. तें खंडरहित आणि दुखःरहित असें आहे.

**जाय लया सर्व दिसणें । तेथें खुंटलें देखणें । मग देखणें आपुलेया खुणें । सदोदित ।11-13।**

ज्या वेळीं दिसणारे पदार्थ नाहींसे झाले, त्याचवेळी पाहाणाराचा पहाणेपणा नाहींसा झाला. अशी स्थिति झाली म्हणजे, मग आत्मस्वरूपाची खूणच नेहणी पहावयाची.

**तें आपणचि आपण । अविनाश परिपूर्ण । ऐसें ओळखावें परतोन । स्वस्वरूप ।11-14।**

ती खूण म्हणजे कधीहि नाश न होणारे असे परिपूर्ण भरलेलें आपलेच स्वरूप आहे, असें वारंवार ओळखावें.

**नेणिवेच्या निराशें । कारण शरीर नासे । जाणिवही समरसें । महाकारणीं ।11-15।**

तात्पर्यार्थ असा, कीं अज्ञानाचा निरास झाला, म्हणजे अज्ञान हेंच ज्याचे स्वरूप अशा कारणदेहाचा नाश होतो. आणि नंतर ज्ञान हे आपोआपच महाकारण देहाशीं एकवटून जाते.

**सुषुप्ति आणि तूर्या । प्राज्ञ प्रत्यगात्मा अभिमानिया । विश्व तैजस गेलिया । जागृत्स्वप्न कैचें ।11-16।**

निद्रा आणि तूर्या या अवस्था व प्राज्ञ आणि प्रत्यगात्मा हे त्यांचे अभिमानी तसेंच जागृति आणि स्वप्न व विश्व आणि तैजस हे त्यांचे अभिमानी हे नाहींसे झाल्यावर मग त्या चारही अवस्था कोठून राहतील ?

**एंव देहचतुष्ट्याचे निरासा । करूनि जाणिजे अविनाशा । तंव आपणचि स्वयंप्रकाशा । ज्ञानघन ।11-17।**

या प्रमाणें स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण या चारहि देहांचा निरास करून, ज्याचा कधींहि नाश होत नाहीं, अशा स्वयंप्रकाशपूर्ण ज्ञानस्वरूप अशा आत्मस्वरूपाचें ज्ञान करून घ्यावें

**सांडुनि आपलें जाणिवेशी । जैं स्वस्थ उभा राहासी । तैं काय आहे मग जाणशी । निःसंगपणें ।11-18।**

ज्यावेळीं तूं आपल्या ठिकाणची जाणिव सोडून देऊन, कांहीं विचार न करता स्वस्थ राहशील, तेव्हां मग, निःसंग झालेल्या तुला जाणवयाचें असें काय राहतील ?

**जेव्हां जाणिवेनें सोडिलें । तेव्हां स्फुरणचि खुंटलें । उठले ठायीं लया गेलें । तूजचि माजी ।11-19।**

जेव्हां जाणिवेला सोडून दिलें, तेव्हांच तिची शक्ति नाहींशी झाली. ती शक्ति जशी तुझ्यापासून उत्पन्न झाली, तशी ती पुनः तुझ्याच ठिकाणीं लोपून गेली.

**जाणिव शून्यासहित । तुजमाजी सामावत । तो तूं आत्मा अपरमित । स्वयंभमूर्ति ।11-20।**

ती जी जाणीव, ती आपल्या नाशासहवर्तमान तुझ्या मध्येंच सांठवून राहिली. म्हणून तूं स्वयंभू , अपरिमित व सतत राहणारा (आत्मा) आहेस.

**तेथें जाणिव नेणिव नाहीं । शब्द निशब्द कांहीं । रूप अरूप हेंही । नेणिजे सोय ।11-21।**

मग त्या तुझ्या ठिकाणी ज्ञान, अज्ञान, शब्द, निशब्द, रूप, अरूप अशा प्रकारचा कांहींच भेदभाव राहत नाहीं.

**देखत ना अदेखण । परकीय ना आपण । स्मरण ना विस्मरण । स्मृतिमात्र जें ।11-22।**

तसेंच तेथें पहाणें किंवा न पहाणें, परकी किंवा आपण, आठवण किंवा विसरणें असें कांहीं राहत नाहीं. कारण तें केवळ स्मृतिरूपच आहे.

**वृत्ति ना निवृत्ति । अपूर्ण ना पूर्णस्थिति । अभाव ना भाव प्रतिती । प्रतितीमात्र ।11-23।।**

वृत्ति किंवा निवृत्ति, अपूर्ण किंवा पूर्ण अशी स्थिति, अभाव किंवा भाव यांचा अनुभव, असें कांहीं उरत नाहीं. (कारण ही सर्व प्रत्ययास येणारी असल्यामुळें तीं बुध्दिचा विषय आहेत.)

**धरितां सोडितां न ये । नाहीं आहे म्हणणें राहे । अनुभवीं अनुभवितां नये । ठायीं नेणिजें ।11-24।**

तें धरतां येत नाहीं, किंवा सोडतां येत नाहीं.तें नाहीं म्हणतां येत नाहीं, आहे म्हणतां येत नाही,किंवा त्याचा अनुभव घेऊं म्हटलें, तर तें अनुभवास येत नाहीं.

**ऐसें हें अभ्यासणें । अंतरिचें अंतरि जाणणें । निश्यळ स्वरूपीं स्थिरावणें । कीजे मनाचे ।11-25।।**

अशा प्रकारच्या या आत्मस्वरूपाचा विचार करावा. आणि तें मनाच्या मनांत जाणून घ्यावें. आणि नंतर त्या मनाला निश्यळ अशा त्या ब्रह्मामध्यें स्थिर करावें.

**स्वस्वरूप जाणिजे । मग आलिंगोनि राहिजे । स्वयेंचि चंचळपण कीजे । कल्पना व्यापार ।11-26।**

मनानें आत्मस्वरूप जाणावें, आणि त्यास अगदीं चिकटून रहावें.आपल्या ठिकाणचा चंचलपणा किंवा कल्पनेचा खेळ तो सगळा त्या संबंधाचाच असावा.

## परमामृत

**ऐसें करितां मन विरमे । विषय व्यापार शमे । मग चित्त रमे । कांहीं कांहीं स्वस्वरूपीं ।11-27।**
असें केलें म्हणजे मन स्वस्थ होईल. विषयासंबंधीं उद्योग बंद पडतील. आणि मग त्या मनाला थोडें स्वस्वरूपाचें ज्ञान होऊं लागेल.

**विसरे प्रकाशे स्वरूप । हारपे सांपडे आपेंआप । ऐंसा करितां आक्षेप । मग स्थिरावे ।11-28।**
मग मनाला केव्हां तें स्वरूप दिसेल, केव्हां दिसणार नाहीं, केव्हां तें विसरेल तर केव्हां त्याला सांपडेल, अशा प्रकारें त्या मनाचा एकसारखा प्रयत्न चालू झाला, म्हणजे मग तें आपोआप स्थिर होईल.

**निवांत भोगी स्वरूप । डुलत आनंदे आपोआप । मग तया सुखाचें माप । कवण करि ।11-29।**
आणि अशा प्रकारें मन एकदां स्थिर झाले म्हणजे मग तें स्वस्थपणें आत्मस्वरूपाचा आनंद भोगीत मौजेनें डोलत राहील. मग त्या सुखाची कोणाला तरी गणती करतां येईल काय ?

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते अज्ञान - खंडनं नाम एकादश प्रकरणं संपुर्णम् ।**

---

### प्रकरण बारावें - स्वानुभवसुख वर्णन

**स्वेदकंपादि उठती । अष्ट सात्विकभाव प्रकटती । पावे साम्राज्य संपत्ति । रंक जैसा ।12-1।**
अशा प्रकारें आत्मस्वरूपाचा आनंद प्राप्त झाला म्हणजे स्वेद, कंप वगैरे आठ सात्विकभाव उत्पन्न होतात. आणि भिका-याला जशी सार्वभौम राज्याची प्राप्ति झाली असतां अतिशय हर्ष होतो, त्याहूनहि अधिक आनंद प्राप्त होतो.

**चित्त चैतन्यीं हारपे । उरिजे ज्ञप्तिस्वरूपें । अखंडित आपआपे । ब्रह्मानंद ।12-2।**
चित्त चैतन्यामध्यें एकरूप होऊन जाते. आणि केवळ ज्ञानमात्र अविशिष्ट राहतें. आणि आपल्याच ठिकाणीं अखंडित अशा ब्रह्मानंदाचीं प्राप्ति होते.

**तया सुखाचेनि समरसें । पावे सुलिन दशे । तें बोलावे कैसें । अनुभवी जाणती ।12-3।**
त्या सुखाची प्राप्ति झाल्यावर जीव त्याच सुखामध्यें अगदिं लीन होऊन जातो. त्या सुखाचें वर्णन कसें करतां येईल? तें सुख अनुभवीच मात्र जाणतात.

**जैसें अमृत चाखे आपुले चवी । तैसे स्वसुख अनुभवीं । तेथें कोण आडवी । संसारासी ।12-4।**
ज्याप्रमाणें अमृताची गोडी अवर्णनीय आहे त्याप्रमाणें आत्मसुखाचा अनुभव सांगतां येण्यासारखा नाहीं. मग अशा त्या सुखापुढें संसाराची आठवण कोणास होईल?

**वोळे स्वानंदाचा घन । दाटे सुख परिपूर्ण । तयामाजी विवेक सुजाण । हारपोनि जाय ।12-5।**
मग आनंदाचा मेघ वर्षाव करूं लागतो. अत्यंत पूर्ण अशा सुखाची प्राप्ति होते, आणि त्या सुखामध्यें सर्व विवेक विरून जातो.

**अहंता स्वरूपीं गळे । विषयतृष्णा मावळे । इंद्रियांची लळे । क्रियेविण पूर्ण होती ।12-6।**
अभिमान गळून जातो. विषयांच्या ठिकाणीं असणारी आसक्ति नाहींशी होते. आणि इंद्रियांच्या सर्व इच्छा कोणतेंहि कर्म केल्यावांचून पूर्ण होतात.

**महासुखाचे अरूवारीं । आलिंगी स्वानुभूती सुंदरी । ज्ञानमात्र इयापरि । स्वस्वरूप भोगी ।12-7।**
महासुखरूपी मऊ बिछान्यावर स्वानुभूति (आत्म्याचा अनुभव) रूपी सुंदरीला तो प्रेमानें आलिंगन देतो. आणि अशा प्रकारें आत्मस्वरूपीं राहून तो त्या ज्ञानाचाच अनुभव घेत असतो.

**निरसितां नेणिव । स्वरूपीं समरसे जाणिव । मग एकछत्री राणिव । योगियासी ।12-8।**
अज्ञानाचा नाश होऊ आत्मस्वरूपाचें परिपूर्ण ज्ञान होतें. आणि मग त्या ज्ञानयोग्याला एकछत्री राज्य प्राप्त होते.

**सदां स्वानंदाचे सोहळे । विषयविजाती वितले । स्वरूपसुखाचेनि मेळे । इंद्रियां तृप्ति ।12-9।**
त्या नेहमी आत्मनंदाचे सोहळे भोगावयास सांपडतात. विषयांमध्ये असणारा भेदभाव नाहींसा होतो. आत्मस्वरूपाच्या दर्शनानें प्राप्त होणा-या सुखानेंच सर्व इंद्रियांची तृप्ति होते.

**परमसुखाचेचि भयें । एकहि स्फूर्ति न स्फुरे । कार्यजात विसरे । निमिषांत ।12-10।**
तें उत्कृष्ट सुख नाहीसें होईल, या भीतीनें मग दुस-या कोणत्याही कल्पना त्याला सुचत नाहींत. एका निमिषार्धामध्ये सर्व प्रकारचीं कर्मे आठवत नाहिंशी होतात.

**करूनि यज्ञाचिया कोडी । उभविती स्वर्गाची गुढी । तें सुख कीजे कुर्वंडी । या ब्रह्मसुखासी ।12-11।**

कित्येक साधक कोट्यावधि यज्ञयागादि कर्मे करून स्वर्गसुखावर आपले निशाण लावतात, पण तें सुख या ब्रह्मसुखावरून ओवाळून टाकावे, इतकें तें तुच्छ आहे.

**आनंद आनंदाशि घोंटि । बोलतां परेशि पडे मिठी । मुक्याने सुखाच्या गोष्टि । केविं कीजे ।12-12।**

तेथें आनंदच आनंदाचे पान (पिणे) करीत असतो. त्या आनंदाचें वर्णन करित असतां वाचेला मौन पडतें, अशा प्रकारें मुकपणा आल्यावर मग त्या सुखाचें वर्णन कसें बरें करता येईल?

**खुंटले मनाचे जाणणें । तें सुख अनुवादावे कवणें । हें अनुभवी तोचि जाणे । इतरां टकमक ।12-13।**

ज्या ठिकाणी मनाचा जाणतेपणा नाहिंसा झाला,तें सुख मनावाचून दुस-या कोणी बरें सांगावें? हें सर्व जो अनुभवी असेल, त्यालाच समजेल. इतरांनी फक्त त्याच्या तोंडाकडे मात्र पाहात बसावें.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते स्वानुभवसुख वर्णन नाम द्वादश प्रकरणं संपुर्णम् ।**

---

**प्रकरण तेरावें - मुक्तिरहस्य**

**ऐसीं पावोन योगखूण । स्वानंद भोगितो परिपूर्ण । तया योगिया न घडे शीण । संसाराचा ।13-1।**

अशा प्रकारची योगाची खूण सांपडून त्याला आनंदाचा यथेच्छ उपभोग घ्यावयास सांपडतो. अशा प्रकारच्या योग्यास संसाराचे (जन्ममृत्युंचे) त्रास कधींही भोगावे लागत नाहींत.

**झाले ब्रह्म आपम । योगी सहज परिपूर्ण । सदा स्वानंद निमग्न । ज्ञप्तिमात्र ।13-2।**

तो योगी सहज व परिपूर्ण अशा ब्रह्माशी एकरूप होऊन जातो आणि सदोदित आनंदसुखांत निमग्न होतो. तो ज्ञानस्वरूपच होऊन राहतो.

**संकल्प आणि विकल्प । दोनी न दिसती अल्प । सुख पावले अमुप । म्हणोनियां ।13-3।**

संकल्प किंवा विकल्प या दोहोंपैकीं त्याच्या ठिकाणी एकदांसुध्दा थोडाहि असत नाहीं. म्हणून त्या योग्यांना अकल्पित सुख प्राप्त होतें.

**साधन असाधन खुंटलें । अकरणें करणें मोडले । आपणचि ते झाले । परब्रह्म ।13-4।**

साधन किंवा असाधन (न करणें) करणें किंवा न करणें हीं सर्व नाहिंशी होतात आणि तो योगी आपणच ब्रह्मरूप होऊन जातो.

**नाहीं धारणा ध्यान । नाहीं समाधि आसन । चुबुकळील आनंदघन । आपणामाजी ।13-5।**

मग त्या योग्याला यम , नियम ,आसन , प्राणायाम , प्रत्याहार , धारणा , ध्यान , समाधि इत्यादि अष्टांगयोगाच्या साधनांची जरूर लागत नाहीं. तो आत्मानंदामध्यें आपणच एकसारखा बुड्या मारित राहतो.

**भुवनत्रयीं क्रीडती । स्वइच्छा वर्तती । अखंड स्फुरे ज्ञप्ती । म्हणोनियां ।13-6।**

त्या योग्यांस अखंड ज्ञान झालेलें असतें, म्हणून ते स्वच्छेनें वागत त्रिभुवनांत आनंदाने क्रिडा करीत असतात.

**विधीनिषेधाची कडसणी । न वर्ते जया अंतःकरणीं । पापपुण्याची काहाणी । तेहि नेणती ।13-7।**

विधी किंवा निषेध ( अमूक एक क्रम करावें असें सांगणें तो विधी, आणि अमुक करूं नये असें जें सांगणें तो निषेध ) हा नियम योग्यांच्या अंतःकरणांत कधीं येतच नाहीं, म्हणून पापपुण्याची गोष्टच त्याला माहित नसते.

**शुभाशुभ फळें । न बाधती कवणे वेळे । ते सर्वांपासुन सुटलें । जीवनन्मुक्त ।13-8।**

कारण पुण्याचे फळ शुभ व पापाचे फळ अशुभ , ही फळें योग्यांना केव्हांहि भोगावी लागत नाहिंत. ते जीवन्मुक्त झालेले असल्यामुळें, ते सर्व नियमांपासुन सुटलेलेच असतात.

**बंध मोक्षाची वार्ता । नायकती सर्वथा । सहजचि ध्याती शाश्वता । अखंडितासी ।13-9।**

बंध ( बांधलेला, संसारात गुरफटलेला असणें ) आणि मोक्ष ( मोकळा होणें ) या गोष्टी ते मुळीच बोलत नाहींत किंवा ऐकतहि नाहींत. तर ते नेहमी राहणारे ( शाश्वत ) आणि अखंडित अशा ब्रह्माचेंच चिंतन करीत असतात.

**जे मनापासोनि सुटले । तया संशय नुरले । करणीय अकरणीय गेलें । सर्व कर्म ।13-10।**

जे मनापासून सुटले, त्यांचें कर्म किंवा अकर्म, कर्तव्य  किंवा अकर्तव्य हें सर्व नाहिसें होतें. कारण, त्यांच्या अंतःकरणामध्यें कशाहि प्रकारचा संशय नसतो.

**ऐसे होऊनि निभ्रांत । कळो न देती आपुला अंत । लोकांमाजी दावित । भक्तिरहस्य ।13-11।**

## परमामृत

अशी जरी त्या योग्याची वास्तविक स्थिति असते, तरी ते ती लोकांस कळूं देत नाहिंत. याची भ्रांति गेली असा लोकांस ते अंत लागुं देत नाहिंत. लोकांमध्यें ते भक्तिमार्गानें वागुन भक्तिचें रहस्य वाढवीत असतात.

**भक्ति ज्ञान वैराग्य पाहिं । करूनि दाविती आपुलें देहिं । जगासि लाविती सोई । तारक ते ।13-12।**

आपल्याच देहानें भक्ति, ज्ञान आणि वैराग्य यांचें आचरण करून त्याचाच ते जगास उपदेश करित असतात. अशा प्रकारें जगाला मार्गाला लावुन त्याचे ते तारणारे होतात.

**भोगिती स्वरूप रहस्य । करितां सद्‌गुरुचें दास्य । परि भेद नाहीं समरस्य । जाणती जीवेश्वराचें ।13-13।**

आात्मस्वरूपाच्या आनंदचा उपभोग घेतच असतात, व इकडे सद्‌गुरुची सेवाहि करीत असतात.पण जीव व ईश्वर यांमध्यें कोणत्याहि प्रकारचा भेद नाहीं. ते एकरूपच आहेत, असें ते जाणत असतात.

**प्रेमें स्फुंदती नित्य । स्मरण विस्मरणेंवीण नेमस्त । क्षणक्षणा उच्चारित । नाम गुरुचें ।13-14।**

त्यांना स्मरण किंवा विस्मरण ही दोन्हि नसतात. ते नेहमी प्रेमानें स्फुंदत असतात (त्यांच्या नेत्रातुन आनंदाश्रु वहात असतात.) आणि ते क्षणोक्षणि सद्‌गुरुच्या नामाचा जयजयकार करित असतात.

**गुरु परमेश्वर ऐक्यता । तद्रूप जाणोनि भजतां । सन्मान देतां संतां । अति प्रीतीनें ।13-15।**

ते गुरु आणि परमेश्वर यांच्या ठायीं ऐक्य मानुन त्यांचें भजन करीत असतात.आणि जे कोणी साधु त्यांना भेटतील, त्यांना ते अत्यंत प्रेमानें सन्मान देत असतात.

**आणि विश्वामाजी ईश्वरू । एकचि व्यापक सद्‌गुरु । म्हणोनि सर्वाभूतिं आदरू । करिती ते ।13-16।**

जो सद्‌गुरु तोच ईश्वर आपल्या रुपानें सर्व सृष्टि व्यापुन राहिला आहे. असें समजून ते प्रत्येक प्राण्याशी आदरानें वागतात.

**हृदय जयाचे कोमल । सदा शुचिष्मंत निर्मळ । निरंतर आचारशील । पवित्रपणें ।13-17।**

त्यांचें मन अत्यंत कोवळें असते. ते नेहमी अत्यंत शुध्द व निर्मळ असतात आणि त्यांचा आचार सर्वदा पवित्रपणानें युक्त असतो.

**न पाहाती मानापमान । निंदा स्तुति समाधान। धैर्यपणें मन । नांदत जयाचें।13-18।**

मान किंवा अपमान, निंदा किंवा स्तुति, यांची ते पर्वा करीत नाहिंत.त्यांचे मन नेहमी धै-यानें सर्व व्यवहार करित असते.

**सुख दुःख न गणी । समाधान लाभ हाणी । उदार ते अंतःकरणी । न गुंतती कोठें ।13-19।**

सुख, दुःख, समाधान, लाभ, हानी, यांना ते मोजित नाहीत. ते उदार असतात. ते मनानें कोठेंच गुरफटून पडत नाहींत.

**सदा विवेकीं चित्तवृत्ति । पडों न देती विस्मृति । सावधान अहोराती । आत्मस्वरूपीं ।13-20।**

त्यांची चित्तवृत्ति सदोदित विवेकयुक्त असते. ते रात्रंदिवस सावध राहुन आत्मस्वरूपाचा केव्हांहि विसर पडूं देत नाहींत.

**कां धरि पिशाचलीला । तरि होय जगावेगळा । लोकां न दाखवी डोळां । शाहणपणा ।13-21।**

किंवा जीवनमुक्त झालेला पुरूष पिशाच्यासारखेहि खेळ करतो! त्या वेळी तो जगाहुन अगदी वेगळ्या प्रकारें वागुन आपला ज्ञानीपणा कोणास कळूं देत नाहीं

**इत्यादि आचार दाविती । फळापेक्षां न भाविती । लोकांसि देख लाविती । वर्तती असे ।13-22।**

अशा प्रकारें ते वागतात खरें, परंतु त्याच्या मनांत कोणत्याहि प्रकारच्या फळाची अपेक्षा असत नाहीं. आपला कित्ता लोकांनी घ्यावा, असेंच त्यांचे आचरण असते.

**विश्वसाक्षि योगिराणा । जाणे सर्वांतरिंच्या खुणा । परि तो वाटे जना । वेडिया ऐंसा ।13-23।**

तो योगिराज साक्षीरूपानें सर्व ब्रह्मांड पहाणारा असल्यामुळें, तो सर्वांच्या मनामध्ये काय आहे हे ओळखीत असतो. पण तो लोकांना मात्र वेड्याप्रमाणें दिसत असतो.

**असे तरि लोकांमाजी । परि कर्म क्रिया सर्व त्यजी । राहे सहजासहजीं । निष्कर्मपणें ।13-24।**

तो जरि लोकांमध्येच रहात असला, तरि सर्व प्रकारची कर्मे सोडूनच दिलेली असतात. तो कर्मरहित होऊन सहज आनंदानें वागत असतो.

**आपण एक सर्वेश्वरू । कोणा सांगे व्यवहारू । क्रिया कर्म न सांगे करूं । नाथिलेंची ।13-25।**

आपणच सर्वेश्वर (सर्वांना ताब्यांत ठेवणारे) आहों, असें मानुन तो लोकांस कोणत्याहि व्यवहाराचा उपदेश

करीत नाहीं. नसतीच क्रियाकर्मे करण्याचा तो लोकांस कधिहि उपदेश करीत नाहीं.

**उग्र खलता दावितसे । तेणें लोक हांसतसे । हेंही तया नाहीं पिसें । अद्वैतपणें ।13-26।**

तो योगी कांहीं तरि उग्र भासणारे हट्ट धरतो म्हणून त्याला हांसतात. पण त्याचे त्याला कांहींच वाटत नाहीं. कारण त्याला अद्वैताचें वेड लागलेलें असतें.

**ऐशीया स्थिति राहावें । स्वरूप जाणोनी भोगावें। जन उध्दरावें कीं त्यजावें । न स्मरे तो।13-27।**

केवळ अशाच प्रकारच्या स्थितित राहावे, आत्मस्वरूप जाणून त्याचा उपभोग घ्यावा, एवढेंच काय तें त्यांच्या मनामध्ये असते. लोकांचा उद्दार करावा किंवा त्याग करावा, याचें त्याला मुळीं भानच असत नाहीं.

**विश्व आपण भोगो न भोगो । परि स्वरूपतया सांगों । हें कांहीं न दे लागो । आपणाकडे ।13-28।**

या विश्वांतील सर्व पदार्थांचा आपण उपभोग घेत आहों किंवा नाहीं, हे प्रत्यक्षपणानें त्याला सांगतां येत नाहीं. कारण, त्या पदार्थांच्या भोगांचा संबंध तो आपणांकडे बिलकूल लागु देत नाहीं.

**विश्वाचा दाहो न लागो आंगा । तो द्वंद्वातित पैं गा । एकदेशीया जगा । न पाहे योगि ।13-29।**

या विश्वासंबंधाचा ताप योग्याच्या अंगाला बिलकूल लागत नाहीं कारण तो योगी द्वंदाच्या पलीकडचा आहे. म्हणून ब्रह्माच्या मायामय अशा एकाच अंगाचा आश्रय करून राहणारे हें जग, योगी कधींच पाहात नाहीं.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते मुक्तिरहश्य वर्णन नाम त्रयोदश प्रकरणं संपुर्णम् ।**

---

**प्रकरण चौदावें - साक्षात्कार**

**तूं संशय न धरीं । मुक्त वर्तती दोहीं परि। परि तूं अभ्यास करि । सांगितला ऐंसा।14-1।**

बाबारे, तूं मनामध्यें संशय धरूं नको. मुक्त झालेले योगी दोन्ही प्रकारे वागतात. पण बाबा रे, पूर्वी सांगितलेल्या प्रकारचा तूं आधि अभ्यास कर.

**तैसा सहजचि असशी । परि आलें पाहिजे प्रत्ययासी । मग तूं ज्ञानीच होशी । जैसा तैसा ।14-2।**

तुला जें योग्याचे स्वरूप सांगितले, त्या आकाराचेंच तुझे मूळचें स्वरूप आहे; पण हें तुझ्या ध्यानांत आले पाहिजे. हें तुझ्या ध्यानांत आलें कीं तूं देखील अति थोर असा योगी होशील.

**पाहें पा शेंदाडें पिकलीं । तीं काय देंटीहून सोडविलीं। तैसी दशा जरि झाली । तरि राहिली ध्यानीं।14-3।**

बाबा रे, विचार करून पहा. शेंदाडें (चिभूड) पिकली, म्हणजे त्याना देठापासुन सोडवून कां काढावी लागतात? अशा प्रकारची तुझी स्थिति झाली, तरच तें ज्ञान तुला प्राप्त झाले, असें समजावयाचे.

**तंववरि सांगितलिया रिति । स्वरूप ध्याइजे अति प्रीति। तरिच साधे परम प्राप्ति । सत्य जाण।14-4।**

तोपर्यंत पूर्वी सांगितलेल्या रीतीने मोठ्या प्रेमाने स्वरूपाचे ध्यान कर. तरच तुला त्या श्रेष्ठ अशा मोक्षपदाची प्राप्ति होईल, ही खूण विसरूं नको.

**नित्य करावा ऐंसा नेम । पडो न द्यावा संसारभ्रम। धरावा स्वरूपाचा काम । साधनपंथ।14-5।**

अशा प्रकारचा तुझा नेहमी निश्चय असूं दे. आणि हा संसार खरा आहे, असा केव्हांही भ्रम पडूं देऊं नको. आत्मस्वरूपाचीच इच्छा धर. हाच समाधानाचा मार्ग आहे.

**हें नित्य श्रवण करावे । मनन निदिध्यासें अनुभवावें। आळस करून न दवडावें । आयुष्य वृथा।14-6।**

हेंच नेहमी ऐकावे, नंतर त्याचें मनन व निदिध्यासन करून अनुभव घ्यावा. आळसामध्ये राहून आपला जन्म फुकट घालवूं नये.

**ये विषयीं जो आळसी तयां । परमप्राप्ति न होय कल्पांतेंसी। तो सद्गुरुचा उपदेशी । म्हणोंचि नये।14-7।**

या संबंधाने जो आळस करील, त्याला कल्पांति देखिल त्या परम पदाची प्राप्ति होणार नाहीं. जो आळसांतच निमग्न राहतो त्याला गुरुनें उपदेश केला असें म्हणूच नये.

**आतां असो बहु बोलणें । श्रीगुरुसि धरीं जीवें प्राणें। नाहीं सार तयाविणें । अन्य कांहीं।14-8।**

या संबंधाने आतां जास्त कांहीं बोलत नाहीं. गुरुच्या ठिकाणी प्राणापलिकडे भक्ति ठेवावी. गुरुवांचून या जगांत श्रेष्ठ असें दुसरें कांहीं नाहीं.

**तयाचे वचनीं राहि । करूं नको येर कांहि। तरि अनायासें स्वरूप पाहिं । पावशीं तूं।14-9।**

त्या गुरुच्या उपदेश्याप्रमाणे वाग. त्याखेरीज दुसरें कांहिही करूं नको. म्हणजे तुला मोक्ष अनायासें प्राप्त होईल.

## परमामृत

**वृध्दि पावे गुरुकृपा । ऐशीया स्थिति राहें पा । गुरु कष्टि होय बापा । ऐंसा न वर्ते ।14-10।**

गुरुची कृपा नेहमी वाढत जाईल, अशा रीतिने तूं वागत जा. बाबा रे, गुरुला कष्ट होतील अशा रीतिनें तूं कधींहि वागूं नकोस.

**गुरु महिमा अपारू । गुरु तो परात्परू । तुज न कळे म्हणोनि परिहारू । देऊन सांगों ।14-11।**

गुरुच्या थोरवीचा अंत लागणार नाहीं. गुरु हा सर्वांहुन थोर आहे. गुरुचा महिमा तुला समजत नाहीं, म्हणून हें आम्ही तुला मुद्दाम विस्तारानें सांगत आहों.

**आतां तन मन धन । करिं सद्‌गुरुची समर्पण । नाहिं तयाविण । अन्य दैवत जगीं।14-12।**

यासाठीं आतां आपलें शरीर, मन, द्रव्य सर्व कांहीं गुरुला अर्पण कर. गुरुवांचून या जगांत दुसरें दैवत नाहीं.

**गुरु तत्पद शिव । शिष्य त्वंपद जीव । म्हणोनि तयांचे चरणीं भाव । धरिं ऐक्यतेचा।14-13।**

गुरु हें शिवरूपी तत् पद आहे. आणि शिष्य हा जीवरूपी त्वं पद आहे म्हणून तूं त्या गुरुच्या चरणाशी ऐक्यभाव धारण कर.

**गुरु तत्पदसागरु । शिष्य त्वंपदतरंगाकारू । दोन्हिं हारपोनि ब्रह्म निर्विकारू । आपण होइजे ।।14-14।।**

गुरु हा तत्पदरूपी समुद्र आहे. आणि शिष्य हा त्वंपदरूपी तरंग आहे. म्हणून तत् व त्वं हीं दोन्हि सोडुन देऊन आपण निर्विकार असें ब्रह्म होऊन रहावें.

**गुरुभयें प्रेम वाहासी । तरि अवश्य स्वरूप पावसी। कीटकभयें आळिसी । कैसें झालें।14-15।**

गुरुला भिऊन जर तूं त्यांच्याशी प्रेमाने वागशील, तर तुला आत्मस्वरूपाची अवश्य प्राप्ति होईल. गांधिलमाशीच्या भयामुळें पूर्वीची कीडसुध्दां गांधिलच होते, ही गोष्ट ध्यानांत आहे ना?

**आळिसी कीटकता । गुरु देईल सायुज्यता। मग सुखिया होसी तत्वता । स्वरूपीं रमशी।14-16।**

ज्याप्रमाणें किड्याची माशी बनते, त्याप्रमाणें गुरु सायुज्यमुक्ति देईल. मग तुला सुख प्राप्त होऊन तूं अगदिं निःसंशय आत्मस्वरूपीं रममाण होशील.

**तत्वतः स्वरूपीं भेंद नाहीं । परि तें ध्यानैकगम्य पाहिं। मग अनुभवें सुखिया होई । तरशी भवभय।14-17।**

वास्तविक पाहिलें तर त्या परमात्म्याच्या ठिकाणीं कोणत्याही प्रकारचा भेदभाव नाहीं. पण तें आत्मस्वरूप केवळ ध्यान करणें एवढ्या एकच उपयानें साध्य होणारें आहे. ध्यान स्थिर झालें म्हणजे मग अनुभव येऊन तुला सुखाची प्राप्ति होईल, आणि त्या संसाराच्या भयांतून तूं मुक्त होशिल.

**हें शास्त्र गौप्य करावें । कवणा स्फुट न सांगावें। तुझें तुवां अनुभवावें । गुरुगम्य हें।14-18।**

असें जे हें शास्त्र आहे, तें तूं गुप्त राख. उगीच कोणाला तें अघळपघळ सांगत राहुं नको. हें केवळ गुरुमुखानेंच कळणारें असल्यामुळें याचा अनुभव तूं एकट्यानेंच घे.

**पशुजना श्रवणीं घालिशी । तरि काय सिध्दि होय तयासी।**
**सद्‌भाव देखोनि कृपा करिसी । तरि निर्वाहक पाहिजे।14-19।**

या संसारांत जे लोक पशुप्रमाणें वागतात, त्यांना हें ऐकूवून काय फायदा होणार? जर सद्‌भाव पाहुन कृपा करावी असें तुला वाटत असेल, तर प्रथम शिष्य अधिकारी आहे की नाहीं, हें पहा.

**ऐशी गुरुमार्गीची परवडी । तैशी असावी गुरुपदाची गोडी। तरि प्रकाश होतां अर्धघडी । न लागे।14-20।**

गुरुसंप्रदायाचा प्रकार अशा प्रकारचा आहे. अशा प्रकारें जर शिष्याला गुरुच्या पदाची गोडी लागली तर आत्मज्ञान व्हावयास अर्धी घटका देखिल लागत नाहीं.

**गुरुसांप्रदायाची वाट । न धरितां करिशील प्रगट । तरि गुज घेऊनि चावट । होतील बहु ।।14-21।।**

गुरुसांप्रदायाचा मार्ग सोडून जर तूं हें ज्ञान प्रकट केलेंस, तर गुप्त गोष्ट समजली असें वाटुन लोक चावट मात्र होतिल.

**यालागीं ह्रदयीं गुप्त राख । स्वयें परमामृत चाख। सर्व योगियांचा तिलक। होशिल तूं।14-22।**

यासाठी हें ज्ञान गुप्त राख आणि या परमामृताची (उत्तम अमृताची) गोडी तूं स्वतः घे. म्हणजे तूं सर्व योग्यामध्यें अत्यंत श्रेष्ठ होशिल.

**परमामृत ग्रंथ प्रमाण । केलें परमार्थाचें कथन । जयासि पाहिजे गुरुखूण । तेणें हाचि पाहावा ।14-23।**

हा परमामृत ग्रंथ शास्त्राला प्रमाण आहे. यामध्यें परमार्थाचें निरूपण केलेलं आहे. ज्याला गुरुखूण पाहिजे असेल त्यानें हाच ग्रंथ पहावा.

**हेंचि गुरुबीजकथन । म्हणोनी करावें जतन । सेवूनि सद्‌गुरुचे चरण । सुखिया होईजे ।14-24।**

हे गुरुनें सर्व वेदांताचें सार सांगितलें आहे, म्हणून त्याला नेहमीं जपावें. आणि सद्‌गुरुच्या चरणांची सेवा करून सुखी व्हावें.

**म्हणे मुकूंदराज योगिया । ह्याबुध्दि जो अनुभविया । तो पाहे परतोनियां । आपलें स्वरूप ।।14-25।।**

श्रीमुकुंदराज योगी असें म्हणतात कीं ज्यानें या उपदेशाचा अनुभव घेतला तो जीव संसारांतुन मुक्त होऊन मागें परततो आणि त्याला आत्मस्वरूपाचें दर्शन घडतें.

**। इति श्रीपरमामृते मुकूंदराजविरचिते साक्षात्कार प्रकरणं संपुर्णम् ।**

---

Published By :
Vinayanand Charitable Home, India 416 203
924/30, Kaivalya Vishalnagar, Hupari, Dist : Kolhapur (M.S) india
Phone / Fax: 0230- 450365, Email :vchindia@yahoo.com